


सं. ठाणे.
REFBK-0026388

संदर्भ
मू.प्र.
७३०
२६३५८

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

| | |
|---|---|
| 12 DEC 1991 | ~~28 OCT 1992~~ |
| 25 DEC 1991 | 23 FEB 1994 |
| 13 MAY 1992 | 23 FEB 1994 |
| 19 AUG 1992 | 8 MAR 1995 |
| 20 OCT 1993 | 15 FEB 1997 |
| 19 FEB 1994 | |

(क्रु. मा. पहा)
१००००–११–८९

# मॉरिशस

गगाधर महाम्बरे

REFBK-0026388

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४

मॉरिशस
उत्कर्ष प्रकाशन

MAURITIUS
(Marathi Travelogue)
GANGADHAR MAHAMBARE

**प्रकाशक**
सौ सविता जोशी
उत्कर्ष प्रकाशन
पुणे ४११००४

© सौ अरुंधती महाम्बरे

**छायाचित्रे**
डॉ वनजा दामोदरम
अशोक प्रयाग

**मुद्रक**
प्रमोद वि बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

**मूल्य १५ रुपये**

[library stamp]

# प्रास्ताविक

सप्टेंबर १९९० मध्ये पुण्यातील 'मिटकॉन' या सस्थेतर्फे मॉरिशसला भेट देण्याची सधी मला मिळाली मॉरिशसमध्ये जेवढे हिडता येईल तेवढे हिडलो. तिथल्या नामवत व्यक्तीना भेटलो. पूर्वी ऐकलेला इतिहास भौगोलिकदृष्ट्या डोळ्यानी पाहिला. अनुभवला.

मॉरिशसला जाण्यापूर्वी त्या देशावरील एखादे मराठी किवा इग्रजी पुस्तक मिळवण्याचा प्रयत्न करू लागलो, पण शेवटपर्यंत एकही पुस्तक हाती आले नाही. मित्रवर्य चारुदत्त सरपोतदार, श्रीविद्या प्रकाशनचे मधुकाका कुलकर्णी यानी आपले स्वानुभव सागितले प्रा प्र. श्री. नेरूरकरानी मौलिक मार्गदर्शन केले मग मनात विचार आला की, मॉरिशसमध्ये जागतिक मराठी परिषदेचे अधिवेशन एप्रिल १९९१ मध्ये भरत आहे. त्या निमित्ताने आपल्याला माहीत झालेला मॉरिशस सागण्यास कोणती हरकत आहे ? उत्कर्ष प्रकाशनचे श्री. सुधाकर जोशी यानी ही कल्पना उचलून धरली. हे छोटे पुस्तक म्हणजे त्याचेच दृश्यफल


खर तर 'मॉरिशस'वर प्रबध लिहिला जाईल एवढे सदर्भ माझ्या सग्रही आहेत, परतु त्यातून निवडक तेवढाच मजकूर इथे दिला आहे.

मॉरिशसच्या भेटीमध्ये 'मिटकॉन'चे व्यवस्थापकीय सचालक श्री. सुरेश रानडे, तसेच मिटकॉनचे श्री. सुनील हसबनीस याच्याप्रमाणेच श्री. भा. द. खेर याचे खूप साहाय्य झाले मॉरिशसमधील श्री. अनिल श. बिनीवाले, त्याच्या सुविद्य पत्नी सौ. अनिता आणि त्याचे सुपुत्र चि. बिभास ह्यानी त्याच्या निवासस्थानी माझी उत्तम व्यवस्था ठेवली. चि. बिभासने तर या पुस्तकातला बराचसा भाग मला सागितला आहे. मित्रवर्य श्री. अशोक प्रयाग याच्या सक्रीय पाठिंब्याचाही उपयोग झाला.

या पुस्तकासाठी अनेक मासिके, वृत्तपत्रे आणि पुस्तके याचा मी उपयोग केला आहे. तसेच पुस्तकात प्रसिद्ध करण्यासाठी डॉ. वनाजा दामोदरम आणि अशोक प्रयाग यानी पुरवलेल्या छायाचित्राबद्दल त्याचा आभारी आहे.

शिवरजनी
१२, कलानिकेतन, पुणे ४११०४३

गगाधर महाम्बरे


उ
पाम्प्लेमूस
रिव्हर द राम्पा
मोका
फ्लॅक
ग्रॅंपोर्ट
ब्लॅक रिव्हर
सावाने
पोर्टलुई
रोजहिल
क्यूरपीप
पर्वत
कॅप माल्हेरे
ग्रेंड बे
तेरे रोम पाम्पलेमूस
न्यू ग्रोव
माहेबर्ग
रियाम्बेल
हिन्दी महासागर

मॉरिशस

# मॉरिशस

"God created Mauritius and then heaven, heaven being copied after Mauritius"

—Mark Twain

## इतिहास

अरबी व्यापाऱ्याना खूप आधीपासून मॉरिशस बेटाची माहिती होती मॉरिशसमध्ये प्रचलित असलेल्या लोककथेप्रमाणे भारतीय व्यापारी मॉरिशस बेटाला 'द्वीप' या नावाने त्याआधीपासूनही ओळखत असत पुराणकालीन मारिच राक्षसाचे वशज श्रीरामाकडून रावणाचा पराभव झाल्यावर मॉरिशसमध्ये पळून आले श्रीरामाच्या हातून मरण येत असताना मारिचाने श्रीरामाकडून 'आपला आत्मा नेहमी श्रीरामाचे नाव ऐकत राहील' असा वर द्यावा असे विनवले तेव्हा 'तथास्तु' असे म्हणून श्रीरामाने मारिचाच्या शरीराला स्पर्श केल्यावर त्याचे रूपातर एका मोत्यामध्ये झाले. श्रीरामाने दक्षिणेच्या दिशेने फेकलेल्या या मोत्याने समुद्रात पडताना आपले जे अवाढव्य शरीर धारण केले तेच मॉरिशस बेट असे भाविक मानतात एकोणिसाव्या शतकामध्ये इग्रजानी बिहारमधून जे काही भारतीय लोक मॉरिशसमध्ये आणले, त्यानी आपल्याबरोबर रामायण आणले. दिवसभराच्या श्रम मजुरीनतर रात्रीच्या वेळी आपापल्या झोपड्यातून रामायणाचे पाठातर होत राही अशा प्रकारे मारिचाच्या आत्म्यास रामनामाचे सतत ध्वनी ऐकू येऊ लागले इ.स. १५१० मध्ये गोव्याच्या मार्गावर असताना पोर्तुगीज मॉरिशसला मुक्काम करीत

असत, परतु ते तेथे स्थायिक झाले नाहीत. इ.स. १५९८ मध्ये डच लोकानी मात्र मॉरिशसमध्ये सर्वप्रथम वस्ती केल्याचे दिसते त्याच्या मॉरिस या राजपुत्रावरून त्यानीच या बेटाला मॉरिशस हे नाव दिले इ.स १६३८ ते १६५८ आणि १६६४ ते १७१० या काळामध्ये डचानी या बेटावर वसाहती स्थापन करण्याचे प्रयत्न केले, पण कालातराने त्यानी आपले प्रयत्न सोडून दिल्यावर काही काळपर्यंत मॉरिशस हे केवळ चाचेगिरीचे केद्र बनले डचानी आणलेली जावा बेटातील हरिणे, गुलाम आणि मुख्यत्वेकरून उसाच्या रोपानी खूप वर्षे मॉरिशसमध्ये मूळ धरले

इ.स. १७१५ ते १८१० या कालावधीमध्ये फ्रेचानी या बेटावर स्वामित्व गाजवले त्या वेळी हे बेट 'एल दे फ्रान्स' म्हणून ओळखले जाई. इ.स. १८१० मध्ये ब्रिटिशानी हे बेट काबीज करून डचानी पूर्वी ठेवलेले मॉरिशस हेच नाव कायम केले ब्रिटिशाच्या काळात मळयाच्या शेतीचे आणि साखरनिर्मितीचे प्रमुख बेट झालेल्या मॉरिशसमध्ये फ्रेचानी जी शेतमळ्यावर आणि साखरकारखान्यावर आपली मालकी कायम ठेवली ती आजमितीसही तशीच चालू आहे इतकेच नव्हे तर भाषा, रूढी, कायदा आणि सास्कृतिकदृष्ट्या आजही मॉरिशसवर फ्रेंचाचाच विलक्षण प्रभाव आहे. ब्रिटिशाच्या काळामध्ये गुलामगिरीची पद्धत नाहीशी झाल्यामुळे मॉरिशसच्या ऊसमळ्यामध्ये काम करणारे आफ्रिकन गुलाम हे इतर व्यवसायाकडे वळले त्यामुळे ऊसमळ्यात काम करण्यास मजुराचा तुटवडा पडू लागला. तेव्हा इ.स. १८३५ पासून तेथील मळेवाल्याना हिदुस्थानातून करारावर मजूर आणण्यासाठी ग्रेट ब्रिटनने परवानगी दिली हे स्थलातर इ.स. १९०७ पर्यंत चालू होते या काळामध्ये सुमारे चार लाख पन्नास हजार हिंदी लोकानी मॉरिशसमध्ये स्थलातर केले

मॉरिशसची दि. १२ मार्च १९६८ रोजी ब्रिटिशाच्या गुलामगिरीतून मुक्तता झाली. डॉ. शिवसागर रामगुलाम हे स्वतत्र मॉरिशसचे पहिले पतप्रधान झाले सध्या श्री अनिरुद्ध जगन्नाथ हे मॉरिशसचे पंतप्रधान आहेत, तर गव्हर्नर जनरलच्या उच्चपदावर सर वीरसामी रिंगाद् याची नियुक्ती झाली आहे

## शासन व्यवस्था

ब्रिटिश राज्यघटनेतील तरतुदीप्रमाणे मॉरिशसची राज्यव्यवस्था ही मॉरिशस सरकारच्या शिफारशीनुसार, पण ब्रिटिश राजसत्तेकडून नियुक्त झालेल्या गव्हर्नर

जनरल तर्फे चालते. पतप्रधानाची नेमणूक या गव्हर्नर जनरलने केल्यावर पतप्रधानाच्या सल्ल्याप्रमाणे तो इतर मत्र्याची निवड करतो एकूण ७० सदस्याच्या मॉरिशसच्या कायदेमडळामध्ये एक सभापती, ६२ निर्वाचित सदस्य आणि ८ सामावून घेतलेले सभासद आणि महान्यायवादी असतात. एकूण असलेल्या २० मतदारसघामध्ये प्रत्येकाकडून तीन प्रतिनिधी, सर्व जातीतून मिळून आठ आणि रोड्रीगसमधून दोन प्रतिनिधी निवडले जातात. मॉरिशसच्या विधानसभेची अधिकृत भाषा ही इग्रजी असली तरी सभासदाना फ्रेंच भाषेचा वापर करण्यास मान्यता देण्यात येते विधानसभेची मुदत पाच वर्षांची असून १८ वर्षावरील स्त्री-पुरुषाना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. दरवर्षी १२ मार्च रोजी मॉरिशसच्या पोर्ट लुईस या राजधानीतील चॅम्प दे मार्स येथे राष्ट्रीय पातळीवर स्वातत्र्यदिन पाळला जातो

## भौगोलिक परिस्थिती

हिंदी महासागरातील मॉरिशस बेट, रोड्रीगेस बेट, आगलिगा बेटे आणि कार्गाडोस कराजोस शोल्स या द्वीपसमूहापैकी मॉरिशस हे सर्वात मोठे बेट आहे मॉरिशस मादागास्करच्या पूर्वेस ८०० कि मी. तसेच आफ्रिकेतील सर्वात समीप अशा किनारपट्टीपासून २००० कि मी. अतरावर आहे. हे बेट मुबईपासून ४७०० कि. मी अतरावर आहे. ज्वालामुखी क्रियेतून निर्माण झालेले हे बेट ६१ कि. मी लाब आणि ४७ कि. मी रुद असून त्याचे क्षेत्रफळ १८६५ चौ. कि. मी एवढे आहे. सभोवताली प्रवाळशैल भित्तीची निर्मिती झालेली असून मॉरिशसचा उत्तर भाग मैदानी आणि मध्यवर्ती भाग पठारी आहे. मैदानी प्रदेशाकडून मध्यवर्ती पठाराकडे ६७० मी पर्यत उची वाढत गेलेली दिसते दक्षिण भाग हा पर्वतीय आहे खोल दऱ्यातून अनेक नदीप्रवाह वाहत असल्याचे आढळते. त्यातील ग्रॅड रिव्हर साऊथ इस्ट ही नदी सर्वात लाब म्हणजे ३९ कि. मी ची आहे. पठारी भागामध्ये ग्रॅड वासीन आणि मारे ऑक्स व्हाकोआस ही दोन सरोवरे महत्त्वाची आहेत.

मॉरिशसची विभागणी नऊ जिल्ह्यामधून झालेली असून पोर्ट लुई ही राजधानी आहे मॉरिशसमधील पोर्ट लुई खालोखाल असलेली प्रमुख शहरे म्हणजे बोबासी / रोझहिल, क्युपीप, कात्रबॉर्न आणि व्हाकोआस / फिनिक्स ही होत याखेरीज शभराहून अधिक खेडेगावे असून त्यातील ग्रॅ[illegible] सेंटल [illegible]

ट्रायोलेट आणि गुडलँडस् ही महत्त्वाची आहेत

## हवामान

सपूर्ण वर्षभर मॉरिशसचे हवामान आल्हाददायक असते. समशीतोष्ण आणि आर्द्र प्रकारच्या या हवामानातील साधारणपणे नोव्हेंबर ते एप्रिल मध्ये उन्हाळा असतो, तर मे ते ऑक्टोबरमध्ये हिवाळा ऋतू असतो एप्रिल ते सप्टेबर या काळात जवळजवळ रोज पावसाच्या सरी कोसळतात. सततच्या पावसाच्या माऱ्यामुळे मॉरिशसचे रस्ते नेहमी खराब होतात या रस्तादुरुस्तीवर मॉरिशसला सतत लक्ष द्यावे लागते. उन्हाळ्यामध्ये उष्णकटिबधीय चक्रीवादळे निर्माण होऊन त्यामुळे पर्जन्यवृष्टी होते. डिसेबर ते फेब्रुवारी या कालावधीत राजधानीच्या शहरी पोर्ट लुई येथील तापमान सरासरी २९ अश सेल्सियस एवढे असते मॉरिशसच्या हवामानात आणखी एक गम्मत अशी आहे की बेटावरील सर्वच भागात ते सारखे नसते उदाहरणार्थ ऑगस्ट-सप्टेबरमध्ये तुम्ही तिथे प्रवास करीत असाल तर एकाच दिवशी एका शहरात पावसात चिंब भिजाल, तर दुसऱ्या शहरात उकाड्याने हैराण व्हाल आणि तिसऱ्या शहरात थडीने कुडकुडू लागाल. नोव्हेबर ते एप्रिल या कालावधीमध्ये मॉरिशसमध्ये चक्रीवादळाची शक्यता असते केव्हा केव्हा ताशी २८० कि. मी. च्या वेगाने इथे वादळी वारे वाहू लागतात अशा वादळाची पूर्वसूचना हवामान खात्याकडून खूप आधी वृत्तपत्रे, नभोवाणी, दूरदर्शन सारख्या माध्यमाद्वारे दिली जाते कुठल्याही प्रकारचे नुकसान न करता चक्रीवादळाचे वारे मॉरिशसमधून पुढे सरकत असते. साधारणपणे तिसऱ्या ताकिदीच्या वेळी घराबाहेर न पडण्याचे सागण्यात येते. अशा वेळी दोन-तीन दिवसाच्या खाण्यापिण्याची घरामध्ये बेगमी केली जाते मॉरिशसच्या या वादळाचा फारसा तडाखा बसत नसल्यामुळे परदेशी पाहुण्याना चुकून त्यात सापडल्यास आनदही घेता येतो.

## सूर्यप्रकाशाच्या वेळा

*नोव्हेंबर ते एप्रिल– पहाटे ५ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत*
*मे ते ऑक्टोबर– सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत.*
*वेळ · मॉरिशसची वेळ ही ग्रिनविच मिनटाईमच्या ४ तास पुढे.*

## वनस्पती आणि प्राणी

मॉरिशसमध्ये सुमारे सहाशेहून अधिक प्रकारच्या वनस्पती आढळतात पूर्वी येथे घनदाट वर्षारण्ये होती सततच्या पावसामुळे भूमी हिरवीगार असते. पूर्वीच्या वनस्पतीपैकी काही वनस्पती लुप्त झाल्या आहेत. किनारी प्रदेश ताडाच्या वनानी आच्छादलेले, जास्त उचींचे प्रदेश शेवाळवृक्ष अरण्यानी भरलेले, तर साधारणपणे पन्नास टक्के भूमीवर उसाची लागवड असे मनोरम दृश्य दिसते. वनसवर्धनाच्या दृष्टीने खास प्रयत्न करण्यात आलेले असून त्याचे पहिले महत्त्वाचे पाऊल इ. स १७७० मध्ये पॉम्प्लेमुस या ठिकाणी निर्माण करण्यात आलेल्या वनस्पती उद्यानावरून दिसून येते 'फ्युरिर मॉरिस' सारख्या वार्षिक स्पर्धा लावून राष्ट्रीय पातळीवर सुशोभित रोपे आणि फुलझाडे लावून मॉरिशसचे सौंदर्य वाढवण्याचे प्रयत्न चालतात काही पाश्चात्य वनस्पतीतज्ज्ञानी मॉरिशसच्या विशिष्ट वनस्पतीमधील इतरत्र क्वचित आढळणारे औषधोपयोगी गुण हेरले आहेत. ब्लॅक रिव्हर जॉर्जेसमध्ये सध्या पूर्वीच्या फारच थोड्या जमलाचे अवशेष राहिले आहेत तरीसुद्धा बेल ओंबर, मक्काब सारख्या विभागातून अजूनही काही जुन्या वनस्पती टिकून आहेत चिनी पेरू, रासबेरी, ऑस्ट्रेलियन बॉटल् ब्रशेस, बदाम, मसाल्याच्या पदार्थाचे वृक्ष विशेष, निलगिरी, नारळ, ताड, बाबू, वड इत्यादींनी मॉरिशसची वृक्षसपदा वाढवलेली आहे

युरोपियन वसाहतकऱ्यानी काही निवडक वनस्पतीप्रमाणेच मॉरिशसमध्ये कुत्रा, माजर, उदीर, बकरा, रानडुक्कर, साबर, हरिण, मुगूस सारखे प्राणी येथे आणले सोनेरी वाघुळ म्हणून ओळखले जाणारे सस्तन वटवाघुळ हे मात्र मूळचे मॉरिशसचे आहे. बोलिरिआ मल्टी कॉरिनेट आणि कासारिआ डुसुमेरी जातीचे सर्प मॉरिशसमधील प्रमुख सर्पजातीमध्ये मोडतात

गुलाबी कबूतर, केस्ट्रेल आणि मोरस काकाकुवा हे पक्षी जगभरच्या प्रवाशाना त्याच्या वैविध्यपूर्ण वैशिष्ट्यामुळे आकर्षित करतात. साधारणपणे चाळीस ते बेचाळीस प्रकारचे पक्षी मॉरिशसमध्ये पाहायला सापडतात. मॉरिशसचे नाव घेतल्यावर सर्वप्रथम आठवण होते ती डोडो या सध्या अस्तित्वात नसणाऱ्या पक्ष्याची या पक्ष्याच्या नावावरून मॉरिशसला पूर्वी 'डोडो बेट' असेही म्हणत असत. डोडोचा उल्लेख "डोंडो म्हणाला, "सर्वजण जिंकले आहेत, त्यामुळे सर्वांना





पारितोषिके देण्यात येतील" अशा शब्दामध्ये लेव्हिस कॅरोलच्या ॲलिस् इन् वडरलॅंड मध्ये आला आहे.

डोडो हा मॉरिशसचा सन्माननीय पक्षी आहे. मॉरिशसच्या राष्ट्रीय बोधचिन्हावर तो आपल्या डाव्या पायाने मॉरिशस उचलून धरीत असल्याचे दाखवले आहे. त्याचे चित्र मॉरिशसच्या नाण्यावर आणि चलनी नोटावरही दिसते नेहमीच्या बोलण्या-चालण्यात मॉरिशिअन 'ती गोष्ट आता डोडोसारखी मृतप्राय झाली 'असा वाक्प्रचार वापरीत असले तरी डोडोचे माहात्म्य अद्याप कमी झालेले नसल्यामुळे त्याबद्दल थोडे विस्ताराने सागितले पाहिजे

थॉमस हर्बर्ट या इ. स १६२७ मध्ये मॉरिशसला आलेल्या प्रवाशाने सर्वप्रथम डोडोचे गुणगान केलेले दिसते हा प्राणी साधारणपणे ५० पौंड वजनाचा असे त्याचे शरीर करडे असून शेपटीकर्डाल पिसे पाढरीशुभ्र असत. त्याचे पाय पिवळसर असून तो सथपणे चालत असे डच लोकानी मॉरिशसमध्ये इ. स. १६३८ मध्ये पहिली वसाहत केली तेव्हा ते डोडोचे मास भक्षण करीत असत, परतु डच लोकाना डोडो खाण्यात काही मजा वाटत नसे 'हा प्राणी खायला अत्यत क्लेषकारक अगदी स्टुपिड फूल' ही खाणारा म्हणतो वातड खवय्याची प्रतिक्रिया असे इ. स १६८१ च्या सुमाराला डोडो हळूहळू दिसेनासा झाला. पधराव्या शतकातील रोलाड सॅव्हेरी या सुप्रसिद्ध पक्षीचित्रकाराने डोडोचे जे चित्र काढलेले होते ते प्रातिनिधिक मानण्यात येते डोडोच्या शरीराच्या काही भागाचे अवशेष जगातील काही म्युझियम्समध्ये राखून ठेवण्यात आले आहेत. त्यातील ब्रिटिश म्युझिअममध्ये त्याचा पाय, कोपेनहेगेन म्युझियममधे त्याच्या डोक्याची कवटी, तर ऑक्सफर्ड म्युझियममधे त्याचा पाय आणि डोके ही आहेत. इ. स. १८६६ मध्ये पक्षीप्रेमी शाळाशिक्षक जॉर्ज क्लार्कने डोडोची अनेक हाडे मिळवण्यात यश सपादन केले होते पोर्ट लुईच्या मॉरिशस इन्स्टिट्यूट म्युझियममध्ये कोडा भरलेला डोडो प्रदर्शनासाठी ठेवला आहे.

## मॉरिशसमधील मत्स्यविशेष

समुद्रवलयांकित मॉरिशसला विविध प्रकारचे मासे पाहायला सापडतात. मत्स्याहारी लोकांना इथल्या समुद्रात सापडणारे प्रिमिअर, बोनिटो हे मासे आपल्या पापलेट आणि बांगड्याची आठवण करून देतील. ब्लॅक मार्लिन, सेलफिश, डोरॅडो,




बोनिटो, ब्ल्यू मार्लिन, ट्यूना, बॅराक्युडा, टायगर शार्क, वाहू, प्रिमिअर हे मासे प्रसिद्ध आहेत. साधारणपणे दोन हजार जातीचे मासे आणि मुळे मॉरिशसच्या सागरातून पाहायला सापडतात. या ठिकाणी मासेमारी खूप मोठ्या प्रमाणावर चालते. इतकेच नाही, तर परदेशातून कित्येक गुलहौशी मत्स्यशिकारीसाठी मॉरिशसला येतात. मॉरिशिअन किनाऱ्यावर सापडलेल्या माशांनी वजनाच्या दृष्टीने जागतिक विक्रम केले आहेत. (उदाहरणार्थ अलीकडेच मॉरिशसच्या किनाऱ्यावर १४३ पौंडाचा निळ्या रंगाचा मार्लिन हा मासा जाळ्यात सापडला होता.) ऑक्टोबर ते मार्च अखेर येथे मासेमारीच्या स्पर्धा भरवल्या जातात. मार्च ते मे पर्यंत पिवळ्या फिन ट्युनाचा मोसम असतो. पश्चिम किनारपट्टीवर मासेमारी जोरात चालते. बहुतेक सर्व किनारपट्टीवरील हॉटेल्समध्ये खोल पाण्यामध्ये फिशिंगसाठी लॉंचेस मिळण्याची सुविधा असते. कॉर्सेअर क्लब, स्पोर्ट फिशर आणि बोनान्झा क्लबमध्ये फिशिंगसाठी गर्दी उसळते. तीन फायटिंग चेअर्स असलेल्या एका लाँचच्या भाड्यासाठी साधारणपणे सकाळी ७ ते दुपारी १ या वेळेपर्यंत ४००० मॉरिशिअन

रुपये आकारले जातात. आणखी ३ तासानी या फिशिंगची मुदत १००० मॉ रुपये अधिक देऊन वाढवता येते

## लोक आणि समाजजीवन

जानेवारी १९८९ च्या शिरगणतीप्रमाणे मॉरिशसची एकूण लोकसख्या १,०३१,४१२ एवढी आहे. जन्मप्रमाण २३, मृत्युप्रमाण ७ आणि लोकसख्यावाढीचें प्रमाण दरहजारी १६ आहे. मॉरिशसच्या किनारपट्टीवर सर्वप्रथम वसाहती झाल्यामुळे तेथे लोकवस्तीचे प्रमाण जास्त आहे. लोकसख्या समिश्र स्वरूपाची असून त्यात हिंदू, मुसलमान अशा हिंदी, चायनीज, युरोपियन, आफ्रिकन आणि समिश्र जातीच्या क्रिओल्ड लोकाचा समावेश होतो सर्वजण गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. हिंदूमध्ये अस्पृश्यता पाळली जात नाही भोजपुरी भागातून आलेले हिंदू आपल्याला आर्यन तर अन्य हिदू मराठा म्हणून ओळखले जातात. इथल्या हिंदूच्या घरावर भगवा ध्वज फडकलेला दिसतो घरात देवाच्या मूर्ती असतात. जगातील सर्व धर्माचे आणि पथाचे लोक मॉरिशसमध्ये असल्यामुळे हे सर्वच धर्म आणि पथ मॉरिशिअन लोकाच्या परिचयाचे आहेत असे असले तरी येथे आढळणारे प्रमुख चार धर्म हिंदू, इस्लाम, बौद्ध आणि ख्रिश्चन हे आहेत पोर्टलुईमध्ये पॅगोडा तर मॉरिशसच्या जवळजवळ सर्वच भागामध्ये देवळे, चर्चेस आणि मशिदी आढळतात.

लोकसस्कृतीचे अभ्यासक मॉरिशसमधील लोकाच्या बहिरगावरून मॉरिशसला थोडे युरोपियन, थोडे एशियन आणि थोडे आफ्रिकन राष्ट्राचे मिश्रण असे सबोधतात. याचे कारण जगाच्या पाठीवरील लोकाच्या चेहऱ्याचे एक मजेदार मिश्रण मॉरिशसला पाहायला मिळते. गोरेगोमटे आणि काळेकुट्ट लोक जसे इथे आहेत, तसेच गोरे गोरे गाल आणि निग्रोसारखे कुरळे काळे काळे बाल असलेले लोकही इथे पाहायला मिळतात आफ्रिकी चेहऱ्यावर चिन्यांचे डोळे असणारे लोकही इथे आहेत त्यामुळे मॉरिशसमध्ये आपल्या डोळ्यासमोर येणारा माणूस हा नक्की कोणत्या वशाचा आहे हे जावे त्याच्या वशा किंवा त्याने सागावे तेव्हाच कळायचे या सस्कृती सगमामुळे मॉरिशसमधील सामान्य माणूस हा कमालीचा सहिष्णु बनला आहे असे त्याच्याशी बोलत असताना वाटते. विविध धर्मांच्या आणि सस्कृतीच्या पद्धतीप्रमाणे मॉरिशसमधील लोक आपापले वेष परिधान करीत

असले तरी पाश्चात्याच्या अनुकरणाने अद्ययावत पोषाखाचा त्याच्यावर प्रभाव पडला आहे. डच लोकाच्या प्रभावामुळे येथल्या रस्त्याची किंवा स्थानाची नावे जशी डच भाषेत दिसतील तशीच ती फ्रेंच भाषेतीलही आहेत. बनारस, गोकुळ, ब्रह्मस्थान ही भारतीय तर मक्का-मदिना ही मुस्लीम नावेही मॉरिशिअन लोकानी इथे दिलेली आढळतात जसजसा जमाव गोळा होईल आणि वास्तव्याला राहील तसतशा त्या जागाना नावे पडत गेल्यामुळे मॉरिशसमध्ये एकट्या पोर्टलुईमध्ये कित्येक स्थळे ही कलकत्ता, कालिकत, गोवा, सिलोन, दिल्ली, हैदराबाद, मदुरा, मद्रास, पाटणा इ. स्थळाच्या नावानी तर रामस्वामी, टागोर, शेक्सपियर, तुलसीदास या व्यक्तींच्या नावानी ओळखली जातात. राहणीतील वेगळेपणामुळे इथले चिनी लोक इतरापेक्षा खूप वेगळे असल्याचे मानतात. हे त्याच्या आचारविचार, पोषाखाप्रमाणे त्याच्या दुकानावरील नावाच्या चिनी भाषेतील पाट्यावरून लक्षात येते त्याची सघटना असल्यामुळे आणि विशिष्ट सस्कृतीची जपणूक करीत असल्यामुळे चिनी भाषेत दोन दैनिकेही प्रसिद्ध होत असतात. सध्या मॉरिशसमध्ये सात दैनिके प्रसिद्ध होतात. त्यातील बहुतेक फ्रेंचमध्ये मजकूर प्रसिद्ध करतात काही दैनिकामध्ये फ्रेंचबरोबर इग्रजीही मजकूर देतात. वृत्तपत्रामध्ये एक्सप्रेस, न्यू नेशन, सन, सोशिआलिस्ट, मॉरिशिअन, चायनीज डेली न्यूज आणि चायना टाइम्स ही दैनिके येतात. साप्ताहिकातील वुइकएण्ड, मॉरिशस टाइम्स, मॉरिशस टुडे, सण्डे, वुइक एण्ड, स्कोप ५-प्लस, नोविऊ मिलिटण्ट आणि दिमॅन्चे ही प्रसिद्ध आहेत. सार्वजनिक सुट्ट्यामध्ये हिंदूच्या महाशिवरात्र, गणेश चतुर्थी, दिवाळीला, मुस्लिमाच्या ईद-अल-फित्रला, ख्रिश्चनाच्या ऑल सेण्टस् डे आणि न्यू इयर आणि ख्रिसमसला, तर चायनीजच्या स्प्रिंग फेस्टिव्हल याचा समावेश असतो

## भाषा

मॉरिशसची शासकीय भाषा ही इग्रजी असली तरी बहुतेकाचे दैनदिन व्यवहार फ्रेंच भाषेमध्ये चालतात (त्याचे प्रत्यन्तर मॉरिशसमधील शहरी बसमधून प्रवास करताना पहिल्याच दिवशी येते तुम्ही बसकडक्टरला 'ही बस अमक्या अमक्या ठिकाणी जाते का ?' असे इग्रजीत विचारा. या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असल्यास तो चटकन् 'वुई' असे फ्रेंचमध्ये देईल). क्रिओल या भाषेत साधारणपणे येथील लोकव्यवहार चालतात. (काही वर्षांपूर्वी महेंद्र कपूर हा मुबईचा गायक

मॉरिशसमध्ये गेला होता तेव्हा त्याने आपले लोकप्रिय गीत 'इन्ही हवाओमे, इन्ही फिजाओमे, तुझको मेरा प्यार, पुकारे । हे हिंदीत सुरू करण्यापूर्वी क्रिओलमध्ये त्याच्या या वरील ओळी 'द साजी जिबाला, दसा लापुशीला । मोला लामो पे, आपेलावा' अशा अनुवादित करून गायल्याची आठवण अद्यापही मॉरिशिअन देतात.) फ्रेंच-क्रिओल खालोखाल मॉरिशसमध्ये हिंदी, उर्दू, भोजपुरी, मराठी, तामिळ, तेलगू, गुजराती, चिनी, मॅण्डारिन इ. भाषा बोलल्या, लिहिल्या, वाचल्या जातात

## शिक्षण आणि सस्कृती

मॉरिशसमधील साक्षरतेचे सरासरी प्रमाण सध्या पुरुषामध्ये ९५% तर स्त्रियामध्ये ९० % आहे. प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंतचे सर्व शिक्षण शासनातर्फे मोफत दिले जाते इतकेच नाही, तर स्वतत्र प्रयत्न करून इग्लिश आणि फ्रेंचनतरची तिसरी भाषा म्हणून हिदी, तामिळ, तेलगू, उर्दू, मराठी किंवा मॅण्डारिन शिकण्यासाठी सक्रीय संधी देण्यात येते शासकीय शाळातून सुमारे ९० मराठी शिक्षक असून त्यातील साठ टक्क्याहून अधिक हे तेथील मराठी साहित्य परिषदेतील प्रशिक्षित आहेत. या परिषदेतर्फे पोर्ट लुई आणि कात्र बोर्न येथे खास शाळा चालवल्या जातात. काही शाळातून जर्मन आणि अरेबिक भाषाही शिकवल्या जातात.. आपापल्या सस्कृतीचे सवर्धन करण्यास मॉरिशसचे सरकार मदत करते मॉरिशसमध्ये होणाऱ्या जागतिक मराठी परिषदेच्या अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी झालेल्या सभेतील पतप्रधान अनिरुद्ध जगन्नाथ यानी दि. ४ ऑक्टोबर, १९९० रोजी काढलेले उद्‌गार या दृष्टीने लक्षणीय आहेत ते म्हणाले होते- 'सास्कृतिक लोकशाही ही अधिक महत्त्वाची असते विविध भाषा आणि धार्मिक पद्धती यामधून ती फुलत असते मॉरिशसमध्ये हे जे वैभव आहे त्यात मराठीला फार महत्त्वाचे स्थान आहे. ' (लोकसत्ता दि. ६ १० ९०). याच सभेमध्ये महाराष्ट्राला सुपरिचित असणाऱ्या श्रीमती शीलाबाय बापू यानी 'जगातील अनेक आकर्षक सस्कृतीचे मॉरिशस हे केंद्र आहे. एकीकडे आर्थिक भरभराट होत असतानाही आपली मूल्ये आणि परपरा जतन करण्याचे प्रयत्न येथे सतत दिसतात विविधरूपी अशी आमची येथील सस्कृती आहे. आमच्या पूर्वजाबद्दल आम्हाला अतिशय आदर आणि ओढ आहे. अशा परिस्थितीत आमच्या या इद्रधनुष्यी

बेटावर सस्कृतीची आणि मूल्याची घोषणा निर्माण व्हावी अशी माझी अपेक्षा आहे.' असे म्हटले होते

## साहित्य आणि साहित्यिक

मॉरिशसमध्ये वाङ्मय, इतिहास, शास्त्र, कला आदी क्षेत्रामधील अनेक व्यक्ती कार्यरत असून कवी, लेखक आणि चित्रकाराची एक मोठी परपरा असलेली दिसते लेखकाच्या सघटनेचे प्रधान कार्यालय कात्रबोर्न येथे आहे मॉरिशसमधील मराठी समाजाची लोकसख्या सुमारे पन्नास हजार एवढी असून मराठी भाषेची सस्कृती आणि उत्सवपरपरा या लोकानी जतन करून ठेवली आहे. इ. स. १९६४ सालापासून मॉरिशसच्या शिक्षणक्रमामध्ये मराठी भाषेचा समावेश करण्यात आला आहे. मॉरिशस मराठी मडळी फेडरेशन या सस्थेतर्फे मॉरिशसच्या मराठी समाजाचे प्रातिनिधिक कार्य चालते महाराष्ट्रामध्येही 'महाराष्ट्र मॉरिशस मित्रमडळ' ही सस्था स्थापन झालेली असून प्रा. प्र. श्री नेरूरकर या सस्थेचे कार्य मोठ्या निष्ठेने करीत आहेत. महाराष्ट्राला अत्यत जवळून मॉरिशसचा परिचय करून देण्याचे श्रेय प्रा. नेरूरकराना दिले जाते दि. १ मे १९८० रोजी मॉरिशसमध्ये राष्ट्रीय पातळीवर साजरा केलेला महाराष्ट्र दिन आणि छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समारभाचा प्रमुख पाहुणा या नात्याने त्याची निवड करून मॉरिशस सरकारने आपली गुणग्राहकता दाखवली होती प्रा नेरूरकरानी सपादित केलेल्या 'मोरसकथा दशावतार' या प्रातिनिधिक मॉरिशस मराठी लेखकाचा साहित्य सग्रह मुबईच्या महाराष्ट्र राज्य साहित्य सस्कृती मडळाने प्रसिद्ध केला आहे.

मॉरिशसमधील मराठी साहित्यिकामध्ये धर्मा गोविंद, देवजी पडिया, सदानद भिवाजी, आनद (सावत) मल्लू, होमराजेन गौरिया हे प्रमुख आहेत. सदानद भिवाजी मॉरिशसच्या आकाशवाणीवर आणि दूरदर्शनवरही मराठी कार्यक्रम कसोशीने देत असतात. त्याच्या लेखणीतून उतरलेले आणि त्यानीच स्वरबद्ध केलेले खालील मॉरिशस-गीत मॉरिशसमध्ये खूप लोकप्रिय झाले आहे.

**मॉरिशस-गीत .**

*देश माझा हिंद महासागराचा तारा*
*शोभे इथे रम्य वनश्री अवघे मास बारा ॥धृ. ॥*

मॉरिशसमध्ये गेला होता तेव्हा त्याने आपले लोकप्रिय गीत 'इन्ही हवाओमे, इन्ही फिजाओमे, तुझको मेरा प्यांर, पुकारे । हे हिंदीत सुरू करण्यापूर्वी क्रिओलमध्ये त्याच्या या वरील ओळी 'द साजी जिबाला, दसा लापुशीला । मोला लामो पे, आपेलावा' अशा अनुवादित करून गायल्याची आठवण अद्यापही मॉरिशिअन देतात.) फ्रेंच-क्रिओल खालोखाल मॉरिशसमध्ये हिंदी, उर्दू, भोजपुरी, मराठी, तामिळ, तेलगू, गुजराती, चिनी, मॅण्डारिन इ. भाषा बोलल्या, लिहिल्या, वाचल्या जातात

## शिक्षण आणि सस्कृती

मॉरिशसमधील साक्षरतेचे सरासरी प्रमाण सध्या पुरुषामध्ये ९५% तर स्त्रियामध्ये ९० % आहे. प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंतचे सर्व शिक्षण शासनातर्फे मोफत दिले जाते इतकेच नाही, तर स्वतत्र प्रयत्न करून इग्लिश आणि फ्रेचनतरची तिसरी भाषा म्हणून हिंदी, तामिळ, तेलगू, उर्दू, मराठी किंवा मॅण्डारिन शिकण्यासाठी सक्रीय सधी देण्यात येते शासकीय शाळातून सुमारे ९० मराठी शिक्षक असून त्यातील साठ टक्क्याहून अधिक हे तेथील मराठी साहित्य परिषदेतील प्रशिक्षित आहेत या परिषदेतर्फे पोर्ट लुई आणि कात्र बोर्न येथे खास शाळा चालवल्या जातात काही शाळातून जर्मन आणि अरेबिक भाषाही शिकवल्या जातात. आपापल्या सस्कृतीचे सवर्धन करण्यास मॉरिशसचे सरकार मदत करते मॉरिशसमध्ये होणाऱ्या जागतिक मराठी परिषदेच्या अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी झालेल्या सभेतील पतप्रधान अनिरुद्ध जगन्नाथ यानी दि. ४ ऑक्टोबर, १९९० रोजी काढलेले उद्गार या दृष्टीने लक्षणीय आहेत ते म्हणाले होते- 'सास्कृतिक लोकशाही ही अधिक महत्त्वाची असते विविध भाषा आणि धार्मिक पद्धती यामधून ती फुलत असते मॉरिशसमध्ये हे जे वैभव आहे त्यात मराठीला फार महत्त्वाचे स्थान आहे '(लोकसत्ता दि. ६ १० ९०). याच सभेमध्ये महाराष्ट्राला सुपरिचित असणाऱ्या श्रीमती शीलाबाय बापू यानी 'जगातील अनेक आकर्षक सस्कृतीचे मॉरिशस हे केंद्र आहे. एकीकडे आर्थिक भरभराट होत असतानाही आपली मूल्ये आणि परपरा जतन करण्याचे प्रयत्न येथे सतत दिसतात विविधरूपी अशी आमची येथील सस्कृती आहे आमच्या पूर्वजाबद्दल आम्हाला अतिशय आदर आणि ओढ आहे. अशा परिस्थितीत आमच्या या इद्रधनुष्यी

बेटावर सस्कृतीची आणि मूल्याची घोषणा निर्माण व्हावी अशी माझी अपेक्षा आहे.' असे म्हटले होते

### साहित्य आणि साहित्यिक

मॉरिशसमध्ये वाङ्मय, इतिहास, शास्त्र, कला आदी क्षेत्रामधील अनेक व्यक्ती कार्यरत असून कवी, लेखक आणि चित्रकाराची एक मोठी परपरा असलेली दिसते लेखकाच्या सघटनेचे प्रधान कार्यालय कात्रबोर्न येथे आहे मॉरिशसमधील मराठी समाजाची लोकसख्या सुमारे पन्नास हजार एवढी असून मराठी भाषेची सस्कृती आणि उत्सवपरपरा या लोकानी जतन करून ठेवली आहे. इ. स. १९६४ सालापासून मॉरिशसच्या शिक्षणक्रमामध्ये मराठी भाषेचा समावेश करण्यात आला आहे. मॉरिशस मराठी मडळी फेडरेशन या सस्थेतर्फे मॉरिशसच्या मराठी समाजाचे प्रातिनिधिक कार्य चालते महाराष्ट्रामध्येही 'महाराष्ट्र मॉरिशस मित्रमडळ' ही सस्था स्थापन झालेली असून प्रा. प्र. श्री नेरूरकर या सस्थेचे कार्य मोठ्या निष्ठेने करीत आहेत महाराष्ट्राला अत्यत जवळून मॉरिशसचा परिचय करून देण्याचे श्रेय प्रा नेरूरकराना दिले जाते दि. १ मे १९८० रोजी मॉरिशसमध्ये राष्ट्रीय पातळीवर साजरा केलेला महाराष्ट्र दिन आणि छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समारभाचा प्रमुख पाहुणा या नात्याने त्याची निवड करून मॉरिशस सरकारने आपली गुणग्राहकता दाखवली होती प्रा. नेरूरकरानी सपादित केलेल्या 'मोरसकथा दशावतार' या प्रातिनिधिक मॉरिशस मराठी लेखकाचा साहित्य सग्रह मुबईच्या महाराष्ट्र राज्य साहित्य सस्कृती मडळाने प्रसिद्ध केला आहे.

मॉरिशसमधील मराठी साहित्यिकामध्ये धर्मा गोविंद, देवजी पडिया, सदानद भिवाजी, आनद (सावत) मल्लू, होमराजेन गौरिया हे प्रमुख आहेत. सदानद भिवाजी मॉरिशसच्या आकाशवाणीवर आणि दूरदर्शनवरही मराठी कार्यक्रम कसोशीने देत असतात. त्याच्या लेखणीतून उतरलेले आणि त्यानीच स्वरबद्ध केलेले खालील मॉरिशस-गीत मॉरिशसमध्ये खूप लोकप्रिय झाले आहे.

### मॉरिशस-गीत

*देश माझा हिंद महासागराचा तारा*
*शोभे इथे रम्य वनश्री अवघे मास बारा ।।धृ.।।*

*धर्म सस्कृती विविध मानती*
*परि राष्ट्र एक*
*खाद्यास भिडवुनि खादा चालती*
*जरि भाषा अनेक*
*इथे नादतो मनामनातुनी प्रेमाचा अतिरेक*
*देश माझा स्वावलबी स्वतत्र देश प्यारा ॥१॥*

*कोणी म्हणती नदनवन,*
*हे अवघ्या भूमीचे*
*कोणी म्हणती डुलते पंकज*
*हिंद महासागराचे*
*कोणी म्हणती आशास्थान हे शाती समतेचे*
*कोण म्हणे ही असत्य वाणी, पुसा साक्षी सागरा ॥२॥*

*निसर्गरम्य सौंदर्याने आनदते मन*
*सुखे लुटण्या दुरूनी येती इथे बहुजन*
*कौतुक करिते सारी दुनिया वाटे हा अभिमान*
*देशी माझ्या सदैव वाहो स्वातन्त्र्याचा वारा ॥३॥*

*ब्रह्मदेवे सृष्टी रचण्या रचिला जणु हा नमुना*
*स्वहस्ते मग केले येथे मानवधर्म स्थापना*
*देश बंधु आम्ही सदा बाळगु मनि हीच भावना*
*करी घेऊनी भाग्य आपुले हटवू दूर अधारा ॥४॥*

–सदानंद भिवाजी

## नभोवाणी/दूरदर्शन

मॉरिशस ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन (MaBC) तर्फे मॉरिशसची नभोवाणी आणि दूरदर्शन केंद्रे चालवली जातात. पूर्वी हे कॉर्पोरेशन MBC या नावाने ओळखले जात असे, परंतु मोम्बासा ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनची आद्याक्षरेही MBC असून समजुतीमध्ये काही वेळा गल्लत होऊ लागल्याने कालान्तराने मॉरिशस कॉर्पोरेशनने MaBC अशी आद्याक्षरे निवडली. मॉरिशस नभोवाणी आणि दूरदर्शनचे कार्यक्रम प्रामुख्याने फ्रेंच भाषेमध्ये असतात. हिंदी आणि इतर

भाषामध्येही कार्यक्रम सादर केले जातात. नभोवाणीच्या कार्यक्रमाच्या वेळा सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत असतात, तर दूरदर्शनवर दुपारी ३-५५ पासून रात्री ११ वाजेपर्यंत कार्यक्रम सुरू असतात. नभोवाणीवरून फ्रेंच भाषेतील बातम्या सकाळी साडेसात वाजता आणि रात्री सात वाजता देण्यात येतात. इंग्लिशमध्ये सकाळी आठ वाजता असतात. दूरदर्शनवरील फ्रेंच बातम्या संध्याकाळी साडेसात वाजता आणि इंग्लिशमध्ये संध्याकाळी पाच वाजून पंचेचाळीस मिनिटांनी सांगण्यात येतात मॉरिशसमधील नभोवाणीवरून रोज सकाळी इंग्रजीमध्ये शोकवार्ता देण्यात येतात. या बातम्यामध्ये मृत झालेल्या व्यक्तीचे नाव, त्याचे रंगरूप, त्याला असलेले टोपणनाव किंवा ती व्यक्ती ज्याप्रमाणे ओळखली जात असेल त्याची माहिती, तसेच प्रेतयात्रेचा तपशील देण्यात येतो

**हवामानाच्या बातम्या :** पुढीलप्रमाणे देण्यात येतात.

**नभोवाणी .** फ्रेंच सकाळी ७, ७.४५ व १० ०५ दुपारी १२ वा संध्याकाळी ७.१५ वाजता. इंग्लिश सकाळी ८ १० वाजता

**दूरदर्शन** संध्याकाळी ७ ३० वाजता देण्यात येणाऱ्या फ्रेंच बातम्याच्यानंतर.

मॉरिशस नभोवाणी आणि दूरदर्शनची कार्यालये क्युपिप येथील फॉरेस्टसाईड्च्या पेस्टुओ स्ट्रीटवर आहे. एम. एबी. कॉर्पोरेशनचे ओरिएंटल प्रोग्रॅम ऑर्गनायझर म्हणून श्री भूमित्रा शर्मा आयर्गा हे काम पाहतात आणि ते भारतीय आणि चिनी भाषातील कार्यक्रमाची कार्यवाही करतात.

## डाकव्यवस्था

मॉरिशसचे जनरल पोस्ट ऑफिस पोर्टलुइस येथे आहे. (टेलिफोन क्र. ८२८५१). मॉरिशसमध्ये आपल्यासारख्या जागोजाग पत्रपेट्या नसतात. त्यामुळे आपली पत्रे पोस्टात जाऊनच टाकावी लागतात. बऱ्याचशा पोस्टामध्ये महिला कर्मचारी म्हणून कामे करताना दिसतात सोमवार ते शुक्रवार सकाळी ८ ते ११ आणि दुपारी १२ ते ३ ३० वाजेपर्यंत आणि शनिवारी सकाळी ८ ते ११.३० पर्यंत कार्यालये चालू असतात. रविवारी आणि सार्वजनिक सुट्ट्याच्या दिवशी ही कार्यालये बंद असतात

## सार्वजनिक सुट्ट्या

| | |
|---|---|
| जानेवारी १ आणि २ | नवे वर्ष |
| फेब्रुवारी | थाइपुसम कावडी |
| | महाशिवरात्री |
| | चिनी स्प्रिंग फेस्टिवल |
| मार्च १२ | स्वातंत्र्यदिन |
| मार्च | आऊगाडी |
| मे १ | कामगार दिन |
| | इद-अल-फित्र |
| सप्टेंबर | गणेश चतुर्थी |
| नोव्हेंबर १ | ऑल सेण्टस् डे |
| ऑक्टो नोव्हेंबर | दिवाळी |
| डिसेंबर २५ | ख्रिसमस |

(वरीलपैकी काही सुट्ट्यांचे विवक्षित दिवस त्या त्या वर्षीच्या दिनदर्शिकेप्रमाणे ठरवले जातात.)

## दूरध्वनी

मॉरिशसमध्ये पब्लिक टेलिफोन बूथ्स फार कमी आहेत, परंतु पोस्ट ऑफिसेसप्रमाणे पोलिस स्टेशनवरूनही फोन करण्याची सुविधा देण्यात येते ओव्हरसिज टेलिकम्युनिकेशन्स सर्व्हिस (OTS) मधून आणि बहुतेक सर्व प्रमुख हॉटेल्समधून परदेशात फोनकॉल्स करता येतात.

**तारा** OTS मधून तसेच पोस्टातून तारा करता येतात त्याचप्रमाणे OTS मधून टेलेक्स/टेलिफॅक्स पाठवता येतात.

OTS चा पत्ता प्रमुख कार्यालय कॅसीस, पोर्टलुई (टेलिफोन क्र. ८०६२२१.) रात्रदिवस उघडे असते

पोर्टलुईमधील अन्य कार्यालये सकाळी साडेआठ वाजल्यापासून सध्याकाळी पाच वाजून पचवीस मिनिटापर्यंत चालू असतात. ही कार्यालये शनिवारी आणि रविवारी बंद असतात

मेल, पार्सलांसाठी डी एच. एल्. इटरनॅशनल (टेलिफोन क्र. ८७७११/८९२६९/८७५२२) आणि स्कायपॅक (टेलिफोन क्र. ८०७४८) तर्फे जगातील कोणत्याही ठिकाणी पाठविण्याची सोय आहे

## विवाह सुविधा -

परदेशी व्यक्तीना मॉरिशसमध्ये कायदेशीररीत्या वृत्तपत्रातून कायद्याने आवश्यक अशी सूचना देऊन लग्ने करता येतात. मॉरिशसमधील ख्रिस्ती विवाह सोहळ्यामध्ये पेस्ट्रीवर चार-साडेचार हजार रुपयाएवढा खर्च केला जातो तेथील ल पॅटिलिटिक ही सस्था (टेलिफोन क्र. ३५३१९) फार प्रसिद्ध आहे.

## विमानसेवा

विमानसेवेसबधी माहिती जशी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होते तशीच ती दिवसरात्र टेलि. क्र. ८७३६२१ किंवा ६५ ०४१ वर दिली जाते भारतातून जाणाऱ्या प्रवाशाना 'एअर-मॉरिशस' प्रवासाच्या सुविधा देते गवताच्या काडीने युक्त असे शेपूट असलेला मॉरिशसमध्ये 'पेल्ले-एन-क्यू' म्हणून ओळखला जाणारा पक्षी हे एअर मॉरिशसचे प्रतीक आहे हा पक्षी पाहिल्यावर मॉरिशिअन पोरे 'पे अेन् के, पे ऐन के, दोन मोई एन्ती पाके पोसोन्' असे क्रिओलमध्ये 'येरे येरे पावसा'च्या प्रमाणे गातात आणि माशाची मागणी करतात या पक्ष्याकडे पाहून जर पाढरा रुमाल फडकावला गेला तर तो नाकावर धडक देतो एअर मॉरिशसचे मुख्य कार्यालय पोर्ट लुईच्या केनेडी रस्त्यावरील रॉजर्स हाऊस येथे असून त्याचा टेलिफोन क्रमाक ८७७०० असा आहे

## औषधोपचार आणि इस्पितळे

मॉरिशसमध्ये बहुतेक सर्व प्रमुख हॉटेल्समध्ये प्रशिक्षित परिचारिकाची सेवा उपलब्ध असते आवश्यकता भासल्यास शहरातील विविध खाजगी दवाखान्यातून दूरध्वनीवरून डॉक्टर्सना बोलावता येते काही नामवत खाजगी दवाखान्याची नावे आणि त्याचे दूरध्वनी क्रमाक

१) पोर्ट लुई — सिटी क्लिनिक (२०४८६)

२) क्युपिप — क्लिनिक द डॉ डार्ने (८६१[illegible])

मॉरिशस [illegible] २८३४

३) क्युपिप — क्लिनिक फेरिअर (६३३३२)
४) रोझहिल — क्लिनिक द बॉन पेस्त्युअर (४२६४०)
५) कात्रबोर्न — क्लिनिक द. क्यू. बोर्न (५४०४२३)
६) रदुइट — क्लिनिक मॉरिसिएन (५४३०६१)

सर्व शासकीय इस्पितळातील औषधोपचार आणि वैद्यकीय सेवा मोफत असते पोर्ट लुईमधील जितू हे सिव्हिल हॉस्पिटल (२३२०१) प्रसिद्ध आहे. मोका येथे डोळ्याचे हॉस्पिटल (५३४०१५) आणि वाकोआचे कान, नाक, घसा (ENT) हॉस्पिटल (८६२०६१) प्रसिद्ध आहेत. जगातील नामवत हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षण घेऊन आलेले कित्येक डॉक्टर्स मॉरिशसमध्ये प्रॅक्टिस करतात युरोप खडातील प्रशिक्षित डॉक्टर्स मॉरिशसमध्ये माफक दरामध्ये सेवा व्यवसाय करताना दिसतात.

**औषधालये** बहात्तर रोगावर गुणकारी औषधे देणारी वनस्पती मॉरिशसच्या लोककथामध्ये प्रसृत आहे पोर्टलुइच्या सेंट्रल मार्केटमध्ये तसेच रोझहिलच्या मार्केटमध्ये फेरफटका मारल्यावर अशी औषधे आजही सापडतात. पॅपलमउसिस जिल्ह्यातील आयुर्वेदिक केद्र (३१६५१) मॉरिशसमध्ये फार प्रसिद्ध असून तेथे भारतीय आयुर्वेदिक औषधेही मिळतात चिनी औषधासाठी पोर्ट लुईला जावे लागते (फोन क्र. नाही)

**लसटोचणी** परदेशातून मॉरिशसमध्ये जाणाऱ्या प्रवाशापैकी जर कुणी प्रवासी कॉलराग्रस्त भागातून तेथे जात असेल तर त्याला इटरनॅशनल व्हॅक्सिनेशन सर्टिफिकेट सादर केल्याशिवाय मॉरिशसमध्ये प्रवेश करू देत नाहीत. पोर्ट लुई मधील व्हिक्टोरिया स्क्वेअर (२३२४) प्रमाणेच एअर मॉरिशसच्या कार्यालयात (८६८०१) व्हॅक्सिनेशन केद्रे उघडली आहेत

**महत्त्वाचे** ज्या वेळी परदेशातून मॉरिशस विमानतळावर पाय ठेवले जातात तेव्हा विमानतळातून बाहेर पडण्यापूर्वी आपल्याला एका फॉर्ममध्ये मॉरिशसमध्ये आपण कुठे उतरणार आहोत त्याचा ठावठिकाणा देण्याची कायद्याने सक्ती केली जाते तुम्ही त्या फॉर्ममध्ये दिलेल्या पत्त्यावर रक्तपासणीसाठी वैद्यकीय सेवक येतात. इ. स. १८६५ च्या सुमाराला मॉरिशसमध्ये डासाबरोबर मलेरियाचे आगमन होऊन साधारणपणे शभर वर्षापर्यंत त्याचा प्रभाव टिकला होता. त्या तीन वर्षांच्या काळामध्ये बऱ्याचशा मॉरिशिअन्सनी अतर्गत भागामध्ये स्थलातरही केले होते. सध्या या रोगाचे मॉरिशसमधून सपूर्ण निर्मूलन झालेले असले तरी आरोग्याच्या

दृष्टीने ही खबरदारी घेण्यात येते

**नागरी व्यवस्था इ.** पोर्टलुईच्या मोका स्ट्रीटवर पोलिसाचे हेड ऑफिस (८१२१२) असून सर्वत्र पोलिस स्टेशने आहेत. पोलिस, आग आणि ॲम्ब्युलन्ससाठी ९९९ क्रमाकावर माहिती दिली जाते टॅपमधून सोडले जाणारे पाणी पिण्यास योग्य असते. तसेच सर्वत्र २२० व्होल्टस् वीजसेवा पुरवली जाते

## *मॉरिशस अन्य महत्त्वाचे*

**चलन व्यवहार .**

मॉरिशसमध्ये विमानतळावर प्रवेश केल्यावर तुम्हाला डॉलर्सच्या त्या दिवशी निश्चित केलेल्या विनिमयाच्या दरामध्ये मॉरिशिअन चलनी, नाणी इ. विमानतळावर मिळण्याचीच सोय असते साधारणपणे एका अमेरिकन डॉलरला मॉरिशिअन तेरा रुपये मिळतात. मॉरिशिअन एका रुपयाची शभर सेंटमध्ये विभागणी करण्यात येते ५, १०, २०, २५ आणि ५० सेंटस्ची तसेच एक मॉरिशिअन रुपयाची नाणी मिळतात रु. ५, १०, ५०, १००, २०० च्या पटीमध्ये चलनी नोटा असतात. मॉरिशसचे ५ सेटस्चे नाणे भारतीय (जुन्या) ढबू पैशाच्या आकाराचे ताब्याचे असून आता ते डोडोसारखे (किंवा आपल्या १, २ पैशासारखे) लुप्त होऊ लागले आहे. भारतीय प्रवाशाना विशेष आटापिटा न करता ट्रॅव्हल् एजन्सीजकडून अडीचशे डॉलर्स मिळू शकतात. मॉरिशसमध्ये प्रवेश करताना रु ७०० पर्यंतच्या नोटा एका व्यक्तीला आणता येतात, तसेच मॉरिशस सोडताना आपल्या बरोबर रु. ३५० पर्यंतच्या नोटा ठेवता येतात. ट्रॅव्हलर्स चेक्स ड्राफ्टस्च्या स्वरूपातील परकीय चलन आणण्यास परवानगी दिली जाते सुदैवाने पोर्ट लुईमध्ये बॅक ऑफ बरोडा (न्यूटन स्ट्रीट) चे कार्यालय असून तेथील श्री. पाटसकर आदी अधिकारी तत्परतेने सेवा देतात (फोन न ८१५०५/८३८९१). साधारणपणे सर्व मॉरिशसच्या बॅंका सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते दुपारी २ आणि शनिवारी सकाळी ९ ३० ते ११ ३० या वेळात उघड्या असतात. बॅंक ऑफ मॉरिशस आणि बॅंक ऑफ बरोडामध्ये सोन्याची नाणीही विक्रीला असतात. बॅंक मॅनेजर्सशी आधी सपर्क साधून नियमाप्रमाणे ही (भारतीय सुवर्णदरापेक्षा स्वस्त असलेली) सुवर्णनाणी 'सुव्हिनिर' म्हणून आणता येतात.

## जकात व्यवहार

मॉरिशसच्या नियमाप्रमाणे १६ वर्षावरील व्यक्तींना खालीलप्रमाणे ड्यूटी-फ्री वस्तूंना परवानगी असते

२५० ग्रॅम तबाखू (२५० सिगारेटस् किंवा ५० सिगारस्) २ लीटर्स मद्य किंवा बियर, ७५० मि. लि. स्पिरिट किंवा अर्धा लीटर टॉयलेट वॉटर. शेतकी खात्याच्या आगाऊ परवानगीशिवाय कोणत्याही रोपाची आयात करता येत नाही. सहा महिन्यापर्यंत पाळीव प्राणी ठेवता येतात.

## मॉरिशसमधील प्रमुख शहरे आणि गावे

मॉरिशसमधील सर्वात मोठे शहर म्हणजे त्याची राजधानी पोर्ट लुई. हे शहर तेथील प्रमुख व्यापारी आणि प्रशासकीय केंद्रही आहे कारण येथून जगातल्या कानाकोपऱ्याशी व्यवहार चालतात पोर्टलुईखालोखाल बोबासा व रोझहिल ही अगदी एकाला एक लागून असलेली शहरे, क्युपिप, कात्रबोर्न आणि वाकोआस/फिनिक्स ही प्रमुख शहरे आहेत. मॉरिशसमधील प्रमुख गावामध्ये माहेबर्ग आणि सॉइलॉफ या दोन गावाचा समावेश करतात.

**पोर्ट लुई** सुमारे १४०,००० हून थोडी अधिक लोकवस्ती असलेल्या या राजधानीच्या शहराची स्थापना अठराव्या शतकामध्ये झाली तत्कालीन मॉरिशसचे गव्हर्नर माहे व लाबुर्दोने याच्या पुढाकाराने या शहराची रचना करण्यात आली हे शहर अर्धवर्तुळाकृती डोगरानी वसलेले असून या शहराचे एकूण क्षेत्रफळ सोळा चौरस मैल आहे दोन लाखाची लोकसख्या असलेल्या या शहराच्या विभागामध्ये एक महत्त्वाचे बदर आहे. अलीकडे (ऑगस्ट १९९० मध्ये) 'हम' या हिंदी चित्रपटाचे चित्रीकरण पोर्टलुईच्या डॉकच्या परिसरात झाले इ. स. १७३५ मध्ये मॉरिशसमध्ये माहे लाबुर्दो इथे आला तेव्हा त्याने हिंदुस्थानी इजिनियराच्या मदतीने या शहराची आणि बदराची रचना केल्याचा उल्लेख सापडतो याच बदरातून हा फ्रेंच गव्हर्नर इंग्रजाशी लढण्यासाठी हिंदुस्थानात आल्याचे इतिहासकार सागतात. समुद्रावरील चाचे लोक हिंदुस्थानच्या समुद्रकिनाऱ्याना सतत उपद्रव देत असत. त्याना पिटाळण्यासाठी छत्रपती सभाजी महाराजाचे आरमार त्या काळी मॉरिशसपर्यंत जात असे टिपू सुलतानाने इंग्रजाशी लढण्यासाठी मॉरिशसच्या फ्रेंच

राज्यकर्त्यांची मदत मागितली होती. सर रॉबर्ट फर्कहार या मॉरिशसच्या पहिल्या गव्हर्नरने दि. २७ सप्टेंबर १८२० ला पोर्टलुई थिएटरची कोनशिला बसवली होती पिएर पाऊजाद या वास्तुशास्त्रज्ञाने ते काम पूर्ण केल्यावर दि. ११ मार्च १८२२ रोजी या थिएटरच्या उद्घाटन समारंभाच्या दिवशी दोन नाटके रंगभूमीवर सादर केली होती जगभरच्या अनेक नामवंत कलाकारांनी या नाट्यगृहामध्ये आपल्या कला सादर केल्या आहेत. पोप टोनेसी रस्त्यावरची सुरेख लाकडी घरे फ्रेंच संस्कृती निदर्शक आहेत शहराचा कारभार शतकमहोत्सवी' नगरपालिका पाहते नगरपालिका, सचिवालय, लोकसभा इ. च्या इमारती शहराच्या भव्यतेत भर घालतात. भारतीय प्रवास शताब्दीच्या निमित्ताने १९३५ साली आर्यसभेची इमारत समारंभपूर्वक बांधण्यात आली. या इमारतीतच सध्या डी ए. व्ही. कॉलेज चालवले जाते इथून थोड्या अंतरावर विष्णूचे मंदिर असून याच शहरात मीनाक्षी मंदिरही आहे 'कॅम्प द मार्स' हे या शहरातील मोठे मैदान असून एकेकाळी शिपायाच्या कवायतीसाठी प्रसिद्ध असलेल्या या मैदानावर सध्या घोडदौड चालते मैदानात इंग्लंडचा राजा सातवा एडवर्ड याची भव्य प्रतिमा आहे. अनेक नामवंताचे पुतळे बसवले असल्यामुळे हे एक पुतळ्याचे शहर आहे असे भासते. 'कंपनी' भागात साहित्यिकांचे आणि राजकारणी व्यक्तींचे पुतळे आहेत. १८५४ मध्ये महामारीच्या रोगग्रस्तांची सेवा करणाऱ्या डॉ पेट लावाल या रोमन कॅथॉलिक पाद्रीचाही पुतळा आहे. न्यूटन स्ट्रीटवरील प्राचीन ग्रंथाच्या संग्रहालयाला शंभर वर्षांचा इतिहास आहे. पोर्टलुईच्या प्रेक्षणीय स्थळामध्ये जी पी ओ सुप्रीम कोर्ट, रेस कोर्स, सिग्नल पर्वत, हॅंडीक्राफ्ट सेंटर यांचा समावेश होतो सेंट्रल मार्केट आणि शॉपिंग सेंटरमध्ये फेरफटका मारण्यास हरकत नाही 'कॅरी पाऊल' या शहरात चालवलेल्या रेस्टॉरंटमध्ये भारतीय भोजन रुचकर मिळते मांसाहारी लोकांना मॉरिशिअन माशाची लज्जत चाखता येते. ताज, लाई मीन, टुगफॉग, क्वाग ही चो ही या भागातील रेस्टॉरंटस् प्रसिद्ध आहेत

**बोबासा/रोझहिल** पोर्टलुईच्या पूर्वेच्या अंगाने पर्वताच्या रांगा लागतात. त्या संपल्यावर मोका जिल्ह्याला सुरुवात होते पठारी प्रदेशातील या जिल्ह्याचे हवामान थंडगार असल्यामुळे गव्हर्नरच्या निवासस्थानासाठी या भागाची निवड करण्यात आली मोका जिल्ह्याच्या पश्चिमेला 'प्लेन्स विल्हेम्स' हा जिल्हा असून त्यातील बोबासा आणि रोझहिल या शेजारशेजारच्या दोन गावांना मिळून शहराचा

दर्जा देण्यात आला आहे. रोझहिल येथील प्लाझा थिएटरमध्ये मॉरिशसचे बहुतेक सास्कृतिक कार्यक्रम होतात याच इमारतीत नगरपरिषदेचे कार्यालय असून शेजारी क्वीन एलिझाबेथ हे मुलीचे कॉलेज आहे. इथली लोकसख्या सुमारे ९३००० असून बेलफोर उद्यान, टाइन हॉल उद्याने पाहण्यासारखी आहेत. या भागात अनेक शासकीय आणि नामवत व्यक्ती राहतात मान्यवर मत्री सौ शीलाबाय बापू (२५ पिरे लावल स्ट्रीट) या त्यापैकीच एक होत. ब्ल्यू मॉरिशस आणि रिंव्हर साईडचे खाद्यपदार्थ रुचकर असतात मावळत्या सूर्याची किरणे जेव्हा या शहरालगतच्या कोट द गार्दे या डोगरावर पडतात तेव्हा हा डोंगर गुलाबाच्या फुलाप्रमाणे लाल दिसत असल्यामुळे या शहराला रोजहिल हे नाव पडल्याचे सागतात या शहरापासून क्यूपिप शहराकडे जाताना कात्रबोर्न आणि वाकवा ही शहरे लागतात.

**कात्रबोर्न** - हे शहर अत्यत टुमदार असून अलीकडेच येथे इदिरा गाधी कल्चरल सेंटर स्थापन झालेले आहे. केद्राचे सचालक श्री आमोद पारसनीस हे असून या केद्राने वृत्तपत्र-मासिक-पुस्तकाचे ग्रथालय चालू केले आहे. केंद्रातर्फे अनेक सास्कृतिक कार्यक्रम होत असतात शहरातील प्रसिद्ध हॉटेल्समध्ये गोल्ड क्रेस्ट (फोन ५४५९४५) आणि एल् मोनॅको हॉटेल (फोन ४२२८२) याचा समावेश होतो.

**वाकवा** हे शहर क्रीडासाठी प्रसिद्ध असून येथे फूटबॉल, गोल्फ आणि टेनिस हे खेळ मोठ्या आवडीने खेळले जातात. मॅण्डारिन हे हॉटेल (फोन न. ६४५५१) चायनीज डिशेससाठी प्रसिद्ध आहे. ॲन्थ्युरिअम नावाची मॉरिशिअन फुलाची एक प्रसिद्ध जात असून जगामध्ये मॉरिशसचा या फुलाच्या निर्यातीमध्ये दुसरा क्रमाक लागतो येथील हेन्रिएटा (टेलिफोन ८६२९१५) ला भेट दिल्यावर या फुलाच्या दर्शनाने नयनसुख मिळते आधी सागून ठेवल्यास या ठिकाणी या फुलाची सुदर पॅक केलेली पार्सले विकत मिळतात. ही फुले पुष्कळ दिवस टिकतात.

**क्यूपिप** युरोपीय बगले आणि आधुनिक बगले याचे सुरेख मिश्रण असलेले हे शहर या जिल्ह्यातील सर्वात उचावर वसलेले असून त्याला 'मॉरिशसचे काश्मीर' अशी सज्ञा आहे. क्यूपिपमध्ये अनेक कॉलेजस् आहेत. पहिल्या युद्धात धारातीर्थी मरण पावलेल्या मॉरिशसच्या नगरवासियाच्या स्मरणार्थ क्यूपिपला एक स्मारक उभारलेले असून ते रॉयल कॉलेजच्या समोर आहे. वास्तुकलेचे दोन नमुने म्हणुन इथल्या जुन्या फ्रेंच पद्धतीचा टाऊनहॉल आणि आधुनिक पद्धतीची

नगरपालिकेची इमारत दाखवण्यात येतील. इथल्या टाऊन हॉलला लागूनच एक सार्वजनिक ग्रथालय आहे. शहरातील बोटॅनिकल गार्डनही प्रसिद्ध आहे क्यूपिपमध्ये ट्राऊ-ऑक्स सर्फ हा निद्रिस्त ज्वालामुखीही आहे क्यूपिपचे आणखी एक वैशिष्ट्य असे आहे की इथल्या 'कोमाजोरा'मध्ये प्रसिद्ध जहाजाच्या हाताने तयार केलेल्या प्रतिकृती पाहायला मिळतात. कोमाजोरा दर सोमवार ते शुक्रवार या दिवसामध्ये सकाळी आठ वाजल्यापासून सध्याकाळी पाच वाजेपर्यंत प्रदर्शनासाठी खुले असते (पत्ता ब्रासेटी रोड, फॉरेस्ट साईड. टेलिफोन क्र. ६१६४४) क्यूपिपमधील बहुतेक घरे सुदर लाकडी कामाची असून येथील शॉपिंग सेंटर्स चागली आहेत इथली लोकवस्ती सुमारे ६५,००० एवढी आहे क्यूपिपच्या हॉटेल्समधील कॉटिनेंटल (८६३४३४), शाघाय (६११६५) आणि युरोपा (६५०८४) प्रसिद्ध आहेत रेस्टॉरटस्मध्ये कॉलेज लेनमधील महाराजा (६२५३२) मध्ये भारतीय खाद्यपदार्थ मिळतात, रॉयल रोडवरील अशोका (६३११२) मध्ये भारतीय आणि युरोपियन आणि स्थानिक क्रिओल पदार्थ चाखायला मिळतात. अभिजात चायनीज पदार्थांसाठी चायनीज वॉक (६१५४८) आणि ट्रॉपिकाना (६३२८६) ची शिफारस केली जाते 'ल् गुरमेट्' या प्राचीन लाकडी क्रिओल रेस्टॉरटला (६१८७१) पुष्कळ प्रवाशाची ये-जा असते कारण इथल्या खाद्यपदार्थांप्रमाणेच या रेस्टॉरटच्या उद्यानामध्ये असलेली एफेल टॉवरची प्रतिकृती पाहण्यासारखी आहे. क्यूपिपजवळील डोमेनद चॅसिअर हा डीअर हण्टिंग





२६३८

पार्कही प्रेक्षणीय असून इथे दुर्मिळ वृक्ष तसेच पशुपक्षी पाहायला मिळतात

क्यूपिपकडे कात्रबोर्नकडून जाताना पश्चिमेला जी पर्वताची राग लागते त्या विभागाला 'ब्लॅक रिव्हर' असे म्हणतात या पर्वताच्या पायथ्याशी ब्लॅक रिव्हर हा जिल्हा असून येथील चिनी मिल प्रसिद्ध आहे. दक्षिणेकडील मोठ्या मैदानाला चहूबाजूनी डोगरानी घेरलेले असून त्यातील पश्चिमेला सवाने तर पूर्वेला ग्रॉ पोर्ट हे उसाविषयी प्रसिद्ध असलेले दोन जिल्हे आहेत. सवानेमध्ये चहाचेही पीक येते ग्रॉपोर्ट जिल्ह्यातील प्लेजास येथील विमानतळ हे मॉरिशसमधील एकमात्र विमानतळ होय इथल्या ग्राऊडवर विमान उतरल्यावर बाहेर पडल्या पडल्या सर एस्. रामगुलाम याचे विमानतळाला नाव दिल्याचे दिसते या विमानतळावर अराइव्हल् लॉजमध्ये मॉरिशस सरकारच्या टुरिस्ट ऑफिसने एक इन्फर्मेशन काऊटर उघडलेला असून तिथे आपल्याला हवी ती माहिती प्रत्यक्ष भेटीत किवा फोनवर दिली जाते (फोन क्र. ८७३६३५). ग्रॉपोर्टच्या उत्तरेला फ्लेक जिल्हा असून दक्षिणेला रिव्हर द राम्पा आणि पॉम्प्लेमूस हे जिल्हे आहेत. मॉरिशसच्या या प्रमुख शहराप्रमाणे मॉरिशसमधील काही खेडीही आपापल्या वैशिष्ट्यानिशी प्रसिद्ध आहेत. मोका येथील ल टेदुहट् हे तसे एक खेडेगावच आहे. पोर्टलुईस आणि रोझहिलच्या शेजारी असल्यामुळे भौगोलिकदृष्ट्या हे गाव महत्त्वाचे ठरले आहे. नयनरम्य उद्याने आणि आल्हाददायक वृक्षततीच्या परिसरातील या गावाला शैक्षणिक महत्त्व फार आहे कारण या ठिकाणी मॉरिशसचे विद्यापीठ, मॉरिशस इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, मॉरिशस एक्झामिनेशनस् सिंडीकेट, मॉरिशस कॉलेज ऑफ द एअर तसेच मॉरिशस साखर उद्योग संशोधन सस्था आहेत वर्षातून दोन वेळा वृत्तपत्रात जाहिराती देऊन इथली उद्याने जनतेसाठी खुली ठेवण्यात येतात प्रवाशाना सकाळी ९ ते दुपारी १२ वाजेपर्यंत या मोकळ्या प्रशस्त जागेत आणि उद्यानाच्या परिसरात येण्याची मुभा असते. याच शेजारी महात्मा गाधी इन्स्टिट्यूट ही भारत सरकारच्या साहाय्याने उभी केलेली सस्था आहे. महात्मा गाधी इ. स. १९०१ साली दक्षिण आफ्रिकेत जातानात मॉरिशसला गेले होते तत्कालीन गव्हर्नर आणि सस्कृत पडित ब्रूस ह्याचे गाधीजी पाहुणे होते. मॉरिशसमधील भारतीयानी राजकारणात पडावे आणि आपल्या मुलाना शिक्षण द्यावे असे त्या प्रसगी महात्माजीनी सागितले होते महात्मा गाधीच्या आदेशावरून पुढे बॅ डॉ. मणिलाल हे मॉरिशसमध्ये या कार्यासाठी आले होते त्याच्या आणि

कुवर महाराजसिंग (हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी) याच्या प्रयत्नाने इ स १९२४ नतर हिंदुस्थानातून मॉरिशसला मजूर नेण्याची प्रथा बद पडली महात्मा गाधी इन्स्टिट्यूटच्या परिसरामध्ये सर्व सलग्न शैक्षणिक सस्था असून साडेसातशे प्रेक्षक बसू शकतील असे एक प्रेक्षागृह आहे याखेरीज जेव्हा मोठी समेलने किंवा उद्योगजत्रा भरतात तेव्हा शेजारच्या मोकळ्या मैदानावर शामियाने/मडप घातले जातात. दि. १० ऑगस्ट १९९० रोजी सर रिंगाद्-मॉरिशसचे गव्हर्नर जनरल यानी महात्मा गाधींच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण केले (या समारभाला उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले होते). या समारभाच्या दोन दिवस आधी याच इन्स्टिट्यूटमध्ये रामायण परिषद भरली होती आणि त्यासाठी जगभरचे प्रतिनिधी आले होते भारतातून या सस्थेला जाणाऱ्या प्रवाशानी या सस्थेच्या कँटिनमध्ये अवश्य जावे या कँटिनमध्ये माफक भावामध्ये चहा-कॉफी, जेवण मिळत असल्यामुळे आपण आपली तुटपुजी फॉरेन करन्सी वाचवू शकतो. (मॉरिशसमध्ये सामान्यपणे कार्यक्रमाच्या पत्रिकावर 'लच' नावाचा एक आयटेम् असतो भोजनोत्तर आडवे होण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या पुणेरी ब्राह्मणाना मात्र हा प्रकार निराशाजनक वाटेल कारण या लचमध्ये ब्रूमपावामध्ये भजी किवा बटाटेवडा घालून दिलेला पदार्थ दिला जातो सोबत सध्या भारतात चाखायला न मिळणारा कोकाकोला किवा तत्सम पेय असते. देशकालमानाप्रमाणे या प्रकाराकडे आपण सहृदयतेने पाहिले पाहिजे. मॉरिशसच्या रस्त्यावर आणि बसमध्येही येता-जाता उभ्या उभ्या हा लचसेवन प्रकार चालू असतो.)

**साइलॅक आणि ग्रीसग्रीस** दक्षिणेतील साइलॅक हे खेडेगाव समुद्राकडे तोंड करून असलेल्या टेल्फेअर या उद्यानासाठी प्रसिद्ध आहे. सागर बेटावरील क्षणाक्षणाला खडकावर लाटा उसळताना पाहायचे असेल तर ग्रीसग्रीसला हे दृश्य पाहायला मिळते या ठिकाणी पोहण्याची कायद्याने बदी केलेली आहे. या परिसरामध्ये ल नेफ, रॉबर्ट एडवर्ड हार्ट म्युझियम इत्यादी पाहायला मिळतात.

**शेजारील बेटे** मॉरिशस बेटाच्या शेजारील बेटावर सहली काढून जाता येते दुर्मिळ वनस्पतीसाठी आणि पशुपक्ष्यासाठी प्रसिद्ध असलेले इल् रोन्दे हे बेट, उत्तम सागरकिनारा लाभलेले द आब्रे हे बेट, रेस्टॉरटस् आणि बोट हाऊसची सुविधा असणारे इल ऑक्स सर्फस् ही बेटे प्रसिद्ध आहेत

**रोड्रीग्स** १०४ कि. मी असणाऱ्या आणि ३६,००० लोकवस्ती असलेले हे

बेट नितातसुदर आहे. मॉरिशसच्या ससदीय प्रकारच्या शासनव्यवस्थेमध्ये रोड्रीग्समधून दोन प्रतिनिधी निवडले जातात. इग्रजानी १८०९ साली रोड्रीग्स हे बेट आपल्या ताब्यात घेतल्यावर १८१० साली सोळा हजार सैनिकाच्या मदतीने मॉरिशसवर हल्ला केला आणि विजय मिळवला. या विजयी सैनिकामध्ये नऊ हजार सैनिक हिदुस्थानी होते

**अगालेगा** · हे मॉरिशसपासून ५३५ मैलावर आहे सुमारे ३०० लोकाची वस्ती असलेले हे बेट नारळाच्या लागवडीसाठी प्रसिद्ध आहे.

**सेंट ब्रॅंडन** मॉरिशिअन फिशिंग कपनीने लीजवर घेतलेल्या या बेटावर मच्छिमारी चालते, परतु बेटावर राहायला परवानगी दिली जात नाही. मॉरिशसपासून २४५ मैलावर आहे.

## मॉरिशसमधील सण आणि उत्सव

अनेक धर्माचा सस्कृतिसगम असलेल्या मॉरिशसमध्ये सण आणि उत्सवामध्ये विविधता दिसून येते. हिंदू-मुस्लिम-ख्रिस्ती धर्माच्या भारतीयाना परिचित असणाऱ्या सणाप्रमाणेच चिनी आणि फ्रेंच सस्कृतिनिदर्शकही सण मॉरिशसला भक्तिभावाने साजरे होतात. हिंदूच्या सणातील सर्वात मोठा सण शिवरात्रीचा असतो दहा दिवसांचा कडकडीत उपवास केल्यावर भक्तगण कावडीच्या दोन्ही घागरींमध्ये दूध भरून आणि सुदर फुलाना व पानानी सुशोभित केलेल्या कावडीची मिरवणूक काढतात अनेकजण चादीच्या अणकुचीदार अशा मोठमोठ्या दाभणसुयानी आपले शरीर आणि जिभा टोचतात रणरणत्या उन्हातही हे दूध नासत नाही अनेकजण परीतलावाचे पाणी कावडीने नेऊन गावागावातील शकराच्या देवळात जाऊन शकराला स्नान घालतात. या उत्सवाला **कावडी** अशी सज्ञा आहे. इथला **होळीचा** सण आपल्याप्रमाणे पालापाचोळ्याची होळी करून 'शिमगा' करीत साजरा होतो कार्तिकी पौर्णिमेला बोरमार या समुद्र किनाऱ्यावर आणि इतर किनाऱ्यावर हिंदू लोक समुद्रस्नान करतात. गगास्नानाने पापविमोचन होते या आपल्या समजुतीप्रमाणेच त्याचीही समजूत आहे. तामिळी लोकाचा थाई पुसम कावडी हा जानेवारी, फेब्रुवारीतील आणि सित्तीराई कावडी हा एप्रिलमधील कावडी समारभ पाहण्यासारखा असतो. याशिवाय **मकर संक्रांत, दिवाळी,** रक्षाबंधन, गणेशजन्म, कृष्णाष्टमी, रामनवमी, शिवजयंती, तुलसीजयंती, हे सणही

साजरे केले जातात. **विनायकी चतुर्थीच्या** रात्री विनायक मंदिरामध्ये भजनाचा कार्यक्रम होतो (त्यातल्या एका कार्यक्रमाला मी हजर होतो आणि त्या मंदिराला पुण्याहून बांधून नेलेल्या खास चिपळ्या आणि झांजा अर्पण केल्या) त्या दिवशी प्रामुख्याने भारतातून नोकरीनिमित्त गेलेले अनेक महाराष्ट्रीय मंदिरात भेटतात (थोडेसे गमतीचे ! चंद्रोदय केव्हा पाळायचा याचा अद्यापही काही भक्तांना इथे निर्णय घेता येत नाही. कारण कालनिर्णयाने रात्री दहा वाजून पाच मिनिटाची ही वेळ मुक्रर केली असेल तर मॉरिशसच्या स्थानिक वेळेप्रमाणे ही वेळ पाळायची की भारतातील वेळेचा विचार करायचा असा काहींना अजून प्रश्न पडतो.) डिसेंबर-जानेवारीमध्ये काही देवळातून संध्याकाळी साडेपाचच्या सुमाराला जळत्या निखाऱ्यावरून चालण्याचा कार्यक्रम चालतो. आपल्याकडील ताबुताप्रमाणे तलवारीवर चढण्याचा समारंभ इथे साजरा होतो त्यात तलवारींच्या शिडीवर सरसर चढत जाणाऱ्यावर फुले उधळली जातात मुसलमानांच्या सणातील **इद्-अल्-फित्र** आणि **इद-अल्-अधा** हे सण महत्त्वाचे मानले जातात 'इद्-अल्-फित्र' या एक महिनाभराच्या, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत पाळल्या जाणाऱ्या कडक उपवासाचा महिनासमाप्ती दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी मॉरिशसमधील मशिदीतून भाविक दिवसातून पाच वेळा प्रार्थना करतात. इद्-अल-आधीच्या दिवशी मेंढ्या, बकरे आणि बैल यांची प्राणाहुती देऊन त्याचे मांस नातलगांना आणि गरीब लोकांना वाटले जाते मॉरिशसमध्ये साजरा होणारा महत्त्वाचा सण म्हणजे **स्प्रिंग फेस्टिव्हल** इथले बरेचसे चिनी लोक हे ख्रिश्चन असले तरी ते हा सण चिनी पद्धतीप्रमाणे साजरा करताना दिसतात. फटाक्यांच्या धूमधडाक्यात आणि केक्सच्या वाटपामध्ये चिनी रंगून जातात. या निमित्ताने चिन्यांची दुकाने तीन-चार दिवस बंद ठेवली जातात. **चायनीज ड्रॅगन** हा चिनी लोकांचा एक मॉरिशसमधील महत्त्वाचा उत्सव. ड्रॅगन हा चिन्यांचा एक काल्पनिक सपंख सर्प तो सर्वांना शांती आणि सुबत्ता देतो असा चिन्यांचा संकेत आहे. मोठमोठ्या झांजा, ड्रम्सच्या तालावर एक मोठी ड्रॅगनची प्रतिकृती अनेकांचा हातभार लागल्यामुळे पुढे पुढे सरकत असते जमावातील लोक फटाक्यांची आतषबाजी करून हा सण साजरा करतात याखेरीज मॉरिशसमध्ये **स्वातंत्र्यदिन, ख्रिसमस**, हे सण साजरे होतात.

## मॉरिशसमधील खेळ ·

आपल्याकडील फूटबॉल, टेनिस, गोल्फसारखे खेळ मॉरिशसमध्ये खेळले जातातच, परतु मॉरिशसला समुद्राची देणगी लाभल्यामुळे इथे जगभरच्या प्रवाशाना आकर्षित करतात ते **खोलवर पाण्यातील मत्स्यमारीचे** खेळ. यासाठी सप्टेंबर ते एप्रिल हा कालावधी सुयोग्य असा असतो मॉरिशसमधील सर्व मोठ्या हॉटेल्समधून डीप सी फिशिंगसाठी होड्याचे रिझर्व्हेशन करता येते

## काही महत्त्वाची केंद्रे

हॉटेल क्लब (टेलि. ५३६५०३), *स्पोर्ट फिशर (टेलि. ३८३५८), *बिचकोम्बर फिशिग (टेलि. ५३६७७५), *कोरसेर क्लब (टेलि. ३६२६७) **डीअर हंटिंग** हरणाच्या शिकारीसाठी शासकीय मोसम म्हणजे जून ते सप्टेंबर हे महिने होत हॉटेल स्विमिग पूल्समधून **डाइव्हिंगचे** धडे दिले जातात. समुद्राच्या खोल तळातील मासे, जलवनस्पती, शिपले, कोरल्स पाहण्यासाठी मॉरिशस अडरवॉटर ग्रूप, फिनिक्स (टेलि ६५३६८) शी सपर्क साधावा **हॉर्स रेसिंग अँड रायडिंग** हे मॉरिशसचे अन्य लोकप्रिय खेळ. पोर्टलुईच्या चँप द जार येथे दर शनिवारी दुपारी १ ते ५ पर्यत हॉर्स रेसिगचा आनद घेता येतो ल् मेरिडिअन हॉटेलमध्ये हॉर्स रायडिंगच्या सुविधा आहेत क्यूपिपच्या फॉरेस्ट डिपार्टमेट (टेलि. ८६४९६६) कडून माहिती व परवानगी घेऊन मॉरिशसच्या अरण्यातून फेरफटका मारता येतो मॉरिशसचे **'वॉटर स्पोर्टस्'**चे विविध मनोरजक प्रकार बहुतेक हॉटेल्समध्ये पाहायला मिळतात.

## मॉरिशसमधील अन्य प्रेक्षणीय स्थळे

* **ॲक्वेरियम** ट्राऊ ऑक्स विचिसवरील या ॲक्वेरियममध्ये हिंदी महासागरातील रगीबेरगी सागरी जीवनाचे दर्शन होते सकाळी नऊ ते सध्याकाळी ५ पर्यत सर्व दिवशी उघड्या असणाऱ्या या केंद्राला मोफत प्रवेश.
* **सुसरींचे उद्यान** सोमवारखेरीज रोज सकाळी साडेनऊ ते पाच वाजेपर्यंतच्या वेळात मादागास्करहून आणलेल्या या सुसरींचे उद्यान मोफत पाहायला मिळते (टेलि. ८७२५०३)

* **कॅसेला बर्ड पार्क्** वीस एकरच्या भूमीतील ह्या उद्यानात सुमारे दीडशे प्रकारचे पचवीसशेहून अधिक मॉरिशिअन पक्षी-प्राणी पाहायला मिळतात जगामध्ये अत्यत दुर्मिळ असलेले इथले गुलाबी कबूतर पक्षीप्रेमी लोकाना खास करून नक्कीच आनद देईल. प्रवेश फी नाही वेळा दररोज सकाळी ९ ते सायकाळी ५ वाजेपर्यत.
* **डीअर हण्टिंग पार्क** माहेबर्गजवळील ८०० एकर नैसर्गिक उद्यानातील ह्या स्थळी मार्गदर्शक उपलब्ध असतात (टेलि ८७४६५९) दररोज उघडे. प्रवेश फी नाही
* **सर रामगुलाम बोटॅनिकल गार्डन** ऐंशी एकरामधील या उद्यानात जगात क्वचित पहायला सापडणारे 'टॅलिपॉट' पाहायला सापडते शभर वर्षातून टॅलिपॉटला एकदाच बहर येतो आणि त्यानतर ते मरून जाते उद्यानाजवळ गाईड बुक मिळते, पण गाईड भेटतोच असे नाही प्रवेश मोफत. वेळ सकाळी ६ ते सध्याकाळी ६
* **प्लेन चॅम्पेन** ७४० मीटर्सचे राखीव वन ब्लॅक लीव्हर जॉर्जीसचे दोन वेगवेगळ्या पॉइटस्वरून नयनरम्य दर्शन.
* **चॅमॅरेल कलर्ड अर्थ** ब्लॅक रिव्हरच्या धबधब्याच्या शेजारील पिवळ्या, नारिंगी, करड्या, गडद निळया, गुलाबी आणि जाभळ्या रगाच्या छटा असलेली एकत्र पाहायला सापडणारी भूमी या ठिकाणी पावसाळ्यात जाणे धोक्याचे असते.
* **रॉचेस्टर फॉल्स** लटेरेसिनच्या उसाच्या मळ्याकडून जाताना दिसते
* **लेबल्** ताजी फडफडती कोळंबी येथल्या राखीव तळ्यात पाहायला मिळते इथे मॉरिशसच्या वैशिष्ट्यपूर्ण ॲन्थ्युरिअमची लागवडही होते
* **ट्राऊ ऑक्स् सर्क** निद्रित ज्वालामुखी. मॉरिशसच्या सुप्रसिद्ध वालुकामय टेकड्याच्या परिसरामध्ये एका टेकडीच्या स्थळी उभे राहिल्यावर शेजारच्या टेकड्यावरील वाळूवर इद्रधनुष्याचे नृत्य दिसू लागते
* **युरेका** मोका नदीच्या परिसरातील इ. स १८३० मध्ये बाधलेले हे क्रिओल घर आजही दिमाखाने उभे आहे प्रवेश मोफत. दररोज सकाळी साडेनऊ ते सध्याकाळी साडेपाचपर्यंत उघडे असते
* **साखर कारखाने** मॉरिशसची उसापासून तयार होणारी साखर सर्व जगामध्ये प्रसिद्ध आहे हिंदुस्थानातही ती एकेकाळी आयात केली जात होती व 'मोरस'

साखर म्हणून ओळखली जात होती जून ते डिसेंबर महिन्यात प्रामुख्याने मॉरिशसच्या साखर कारखान्यात कामे चालतात. साखर कारखान्याच्या जनसपर्क अधिकाऱ्याना गाठून हे कारखाने पाहायला परवानगी मिळते

## मॉरिशसमधील सागर किनारे

जगभर हिंडलेल्या शौकिनानी एक गोष्ट मान्य केली आहे की मॉरिशसचे सागर किनारे नितातसुदर आहेत. समुद्रकिनारी राहणारा आणि परदेशातील किनारे पायाखाली तुडवणारा सुप्रसिद्ध पॉपसिंगर रेमो (फर्नांडिस) आपल्या मॉरिशसमधील कार्यक्रमाच्या आरभी 'सुदर किनारपट्टी लाभलेल्या मी गोव्यातून आलो, पण आमच्यापेक्षा तुमचे सागरकिनारे अतिशय सुदर आहेत.' अशी ग्वाही देत असे

**पूर्वेकडील किनारे** बेले मेर, पोस्टे लाफायेटे, आइल आऊक्स सर्क.

**पश्चिमेकडील किनारे** पॉइंटे आऊक्स सेबल्स, अल्बिऑन, फ्लिक् एन् फ्लॅक, टॅपॅटिन ल मोर्ने आणि रिन्व्हिल्टे नॉईर

**उत्तरेकडील किनारे** बेत तॉम्ब्यु, बॅलाक्लें व्हा, पेरेबेरे, ट्राऊ आऊक्स बिचीस, ल कुवेटे, मॉन चॉइसी, ग्रँड वे, बेनबाऊफ, कॅप मालहुरॅक्स.

**दक्षिणेकडील किनारे** रिअॅम्बेल, बेदुर्केप, ल प्रेअरी, ब्ल्यू बे

**काही वैशिष्ट्ये** फ्लिक एन् प्लेकची कॅस्युअॅरिनाची वृक्षतती ट्राऊ आऊक्स बिचीस शेजारील हिंदू देऊळ. 'मॉन चॉइसी' हा नावाप्रमाणेच पर्यटकाचा चॉइसी किनारा आहे. पेरेबेरे. निळ्या पाण्यातील अघोळीसाठी सुविधा. कॅप मालहुरॅक्सच्या फिकट हिरव्यागार समुद्राकडे पाहिल्यावर तो ज्वालामुखीतून निर्माण झाल्याचे जाणवते बेलेमेर हा चदेरी वाळूचा किनारा म्हणून प्रसिद्ध. ब्ल्यू बेचा किनारा वृक्षविशेष फिलाओने अर्धवर्तुळाकार शृगारलेला असून सागरीखेळ खेळण्यासाठी सर्व सोयी उपलब्ध केल्या जातात.

**जुगारी अड्डे** मॉरिशसमध्ये असलेले जुगारी अड्डे प्रामुख्याने पाश्चिमात्य पर्यटकाना दिवसेदिवस अधिकाधिक आकर्षित करीत आहेत. काही हॉटेल्समधून असे मोठ्या प्रमाणावरील अड्डे असून राऊलेट, ब्लॅकजॅक अशा नावानी प्रसिद्ध असलेली टेबले या जुगारी अड्ड्यात माडली जातात. 'एका बाहूचा जुगारी', म्हणून ओळखला जाणारा जुगाराचा प्रकार काही हॉटेल्समध्ये असतो. पोर्ट लुईमधील ल

ॲमिकेल मधील चायनीज कॅसिनो सध्याकाळी ७ ते पहाटे २ वाजेपर्यंत चालू असते तर रविवारी आणि सुटीच्या दिवशी दुपारी १ वाजल्यापासून पहाटे २ वाजेपर्यंत चालू असते हॉटेलातील कॅसिनोप्रमाणे क्यूपिपाचे 'कॅसिनो द मॉरिस' विशेष प्रसिद्ध आहे.

**कलाप्रेमी मॉरिशस**

मॉरिशसची जनता अत्यत कलाप्रेमी आहे. त्याच्या म्युझियम्समधून जुन्या वस्तूचे सवर्धन केलेले दिसते पोर्ट लुईच्या नॅचरल हिस्टरी म्युझियममध्ये कोंड्यात भरलेला डोडो, प्राणी आणि मासे पाहायला मिळतात (फोन न २०६३९). पूर्वीचे पतप्रधान आणि माजी राष्ट्रपती सर शिवसागर रामगुलाम याचे जुने वसतिस्थान अशा एका म्युझियममध्ये रूपातरित झाले आहे. मॉरिशसच्या शिक्षण, राजकारण आणि कलेला उत्तेजन देणाऱ्या सुखदेव किसनदयाळ याच्या टायाक या जन्मभूमीला एक म्युझियम स्थापन करण्यात आला आहे. रॉबर्ट एडवर्ड हार्ट या कवीच्या जन्मगावीही एक म्युझियम आहे

**साहित्य सगीत कला** मॉरिशसची क्रिओल ही भाषा शहरी लोक फ्रेंचमिश्रित अशी बोलतात तर ग्रामीण लोक भोजपुरीमिश्रित अशी बोलतात. मुळात ही भाषा फ्रेंच भाषेपासून निर्माण झालेली असली तरी त्यात इग्रजी, भोजपुरी, मराठी, तेलगू, चिनी, फार कशाला— कोकणीही शब्द आले आहेत. चार्लस बैसाक् यानी क्रिओलमध्ये प्रथम 'रिसाईट क्रिओल' हे पुस्तक लिहिले तर डॉ क्यूरे यानी इ. स. १९३६ मध्ये प्रथमच क्रिओलमध्ये सार्वजनिक भाषण केल्याची नोंद सापडते डॉ शिवसागर गुलाम यानी इग्रजी आणि फ्रेंच भाषेतून सुरू केलेले 'ॲडव्हान्स' हे प्रथम लक्षणीय दैनिक. मॉरिशसमध्ये प्रा. विष्णू दयाळ, उदिन गोपाळ, हुसेनजी इदू, डी तपाल, सोमदत्त बखोरी, जय नारायण रॉय इ. लेखक प्रसिद्ध आहेत रॉबर्ट हार्टना राष्ट्रकवीचा सन्मान लाभला होता. मॉरिशिअन फ्रेंच साहित्यामध्ये 'काबो' याचे नाव पहिले मान्यवर कादबरीकार म्हणून घेतले जाते याच फ्रेंच साहित्यात रचीले, ज्यूज, सेग्रे, मासो, तुसे, सञाल हेही प्रसिद्ध आहेत.

**सेगा** हा मॉरिशिअन असा खास लोकसगीत आणि गीताचा प्रकार. या सगीतामध्ये डफलीप्रमाणे आपल्याकडील तमाशात प्रचलित असणारा ट्रॅंगल वाजवला जातो या नृत्यात नर्तक आपला जोडीदार निवडतो परतु नृत्य करताना

दुसऱ्या व्यक्तीला स्पर्श करीत नाही आफ्रिकन लोकानी अमेरिकन मैनिकाची गू…
दिलेली वाद्ये वाजवून पाहिली आणि कालातराने अनुभवाती जसा जाझ प्रकार निर्माण झाला तसेच थोडेसे या सेगाचे आहे. सेगाचे काव्यविषय हे दैनंदिन जीवनातील घडामोडीवर आधारलेले असतात. काही ठिकाणी अजूनही जुन्या सेगाच्या ध्वनिमुद्रिका मिळतात. उडत्या तालावरील शिकण्यास सोपा आणि नृत्य करण्यास आनद देणारा हा प्रकार मॉरिशसच्या प्रसिद्ध हॉटेल्समध्ये ठरलेल्या दिवशी आयोजित केला जातो. ट्रिआनॉनच्या पॅलेडियम हॉटेलमध्ये डिसेबर महिन्यातील प्रत्येक शनिवारी होणाऱ्या 'सेगा' मध्ये विविधता पाहायला मिळते त्यासाठी खूप आधीपासून रिझर्व्हेशन केले जाते (टेलि. ५४६१६८). सेगाच्या जोडीने पाश्चात्य सस्कृतीतून आलेले सर्व नृत्यप्रकार मॉरिशसला पाहायला सापडतात

**रंगभूमी** इ. स १८२२ साली बाधलेल्या पोर्ट लुईमधील नाट्यगृहाची माहिती या पुस्तकात अन्यत्र दिली आहे. मतो हे मॉरिशसमधील पहिले दशावतारी नाटककार. सदानद भिवाजीचे वडील श्री अनत भिवाजी (शकर) हे या दशावतारी नाटकाचे सूत्रधार असून त्यानी या प्रकाराला फार मोठी चालना दिली आहे. मोरस [illegible] ने साधारणपणे रविवारी होतात त्यामुळे शनिवारी सर्वासाठी दशावतारी नाटक ठरलेले असते एकाकिका लेखनात सदानद भिवाजी, देवजी पाडिया, धर्मा गोविंद, सोना धर्मिया ही नावे विशेष प्रसिद्ध आहेत. मुबईच्या महाराष्ट्र राज्य सस्कृती मडळाने प्रा प्र श्री नेरूरकराच्या सपादनाखाली 'मोरस कथा दशावतार' हे पुस्तक प्रसिद्ध केलेले असून त्यात 'नशिबाचे नऊ गिऱ्हे' इ. वैशिष्ट्यपूर्ण एकाकिका वाचायला मिळतात फ्रेंच आणि इग्रजी नाटकाचेही प्रयोग अधनमधन रंगमचावर येतात

**चित्रपट** मॉरिशसच्या जनतेला चित्रपटाचेही खूप आकर्षण आहे. दूरदर्शनवर सातत्याने हिंदी, मराठी, फ्रेंच, इग्रजी चित्रपट पाहायला मिळतात म्हणून असावे इथे चित्रपटगृहाची गर्दी दिसत नाही पोर्ट लुई येथील 'क्लासिक' आणि बेलेरोज येथील एबासी ही शीतानुकूल सिनेमागृहे प्रसिद्ध आहेत भारतातून आणि अन्य ठिकाणाहून नितातरम्य सृष्टिसौंदर्य टिपण्यासाठी मॉरिशसमध्ये चित्रपटाचे शूटिंग चालते मुकुल आनदच्या 'हम' या हिंदी चित्रपटाचे शूटिंग मॉरिशसला सप्टेंबर ९० मध्ये चालू होते त्यात अमिताभ बच्चन, रजनीकात, गोविंदा, किमी काटकर,

शिल्पा शिरोडकर याचा सहभाग होता. याच दिवसात व्हिडिओ शूटिंग स्टुडिओचे उद्घाटन मॉरिशसला झाले नजीकच्या काळात सिनेमा स्टुडिओज झाल्यावर चित्रीकरणाच्या कॅमेरा इत्यादी सुविधामुळे मॉरिशसमध्ये अनेक चित्रपट निघू लागतील यापूर्वी अकुर, मैना व कबूतर हा हिदी आणि 'मुबई ते मॉरिशस' हा मराठी चित्रपट असे मॉरिशसमध्ये चित्रित झाले, परतु मॉरिशसच्या प्रेक्षकाना ते अजून पुरते पाहायला मिळालेले नाहीत. अकुर, मैना व कबुतरचा कॅमेरामन पुणे फिल्म इन्स्टिटयूट प्रशिक्षित जया बगुन ही मॉरिशिअन आहे. त्या चित्रपटात गाईडचे काम करणारा नट माझा मॉरिशसमधील फिल्मी ॲक्टिव्हिटिजचा गाईड होता. त्याच्यामुळे मॉरिशस फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे सचालक श्री विजयकुमार माधु याचा परिचय झाला मॉरिशस फिल्म स्टुडिओ आणि तत्सम अनेक योजना सध्या त्याच्या कार्यवाहीमध्ये आहेत

**चित्रकला** मॉरिशसच्या चित्रकाराची नोद पधराव्या शतकाच्या आरभापासून घेता आली तरी या चित्रकाराची परपरा खडित झालेली दिसते डच आणि फ्रेच चित्रकारानी आपल्याबरोबर त्याची चित्रे मायदेशी परत नेली मॉरिशसला पर्यटनकेद्र म्हणून महत्त्व येऊ लागल्यावर पुन्हा चित्रकलेला चागले दिवस येऊ लागले आहेत. आधुनिक मॉरिशस चित्रकलेमध्ये रगभूमीचे नेपथ्य करणारे सर्ज कॉन्स्टॅन्टिन हे सुविख्यात आहेत त्याचे शिष्य जोसेलिन थॉमस आणि फॅबियन कागो त्याची शिष्यपरपरा चालवीत आहेत. फुलाचे आणि पक्ष्याचे (स्पेशालिस्ट) चित्रकार म्हणून मालकम् द चेझल प्रसिद्ध आहेत. सर व्हेस डेव्हिड हे लॅडस्केपसाठी प्रसिद्ध आहेत. अन्य चित्रकारामध्ये कॉरर, पाऊसीन आदी प्रसिद्ध आहेत. भारतीय घुमट आणि हिंदूची देवालये चितारण्यामध्ये गन्न् या चित्रकाराची खूप ख्याती आहे.

## मॉरिशसमधील उद्योग आणि व्यापार

दि. १८ जून १९९० रोजी मॉरिशसचे उपपतप्रधान आणि वित्तमत्री श्री एल. विष्णू यानी नव्या दशकाची जी पहिलीच वित्तयोजना सादर केली त्यात म्हटले आहे की आर्थिक आघाडीवर गेल्या दशकात मॉरिशसने फार मोठी आघाडी मारलेली आहे. सध्या मॉरिशसमध्ये ज्याला ज्याला नोकरी हवी त्याला ती मिळालेली असून त्यामुळे बेकारीचे सपूर्ण निर्मूलन झाले आहे. मनुष्यबळाला जास्तीत जास्त मदत व्हावी या दृष्टीने मॉरिशस सरकार प्रयत्नशील आहे.

मॉरिशिअनाच्या प्रशिक्षणासाठी आणि उच्च शिक्षणासाठी त्या सरकारने इडस्ट्रियल व्होकेशनल ट्रेनिंग बोर्डची स्थापना केली असून (सचालक श्री सुरेश मुजबोध) भारतीय सरकारच्या सल्ल्यानुसार या सस्थेचे काम चालते. उद्योगीकरणासाठी मॉरिशसमध्ये मॉरिशस चेबर ऑफ कॉमर्स अँड इडस्ट्रीज, स्मॉल इडस्ट्रीज डेव्हलपमेट ऑर्गनायझेशन, एक्स्पोर्ट प्रोसेसिंग झोन आणि मिडिआ ही एक्स्पोर्ट डेव्हलपमेट अँड इन्व्हेसमेट असोसिएशन या सस्था स्थापन केल्या आहेत मॉरिशसची औद्योगिक आघाडी लोकरी कपड्याची निर्यात, साखरेचे उत्पादन आणि पर्यटनावर आहे. मॉरिशसमध्ये एकही मेंढी चरताना दिसत नसली तरी लोकरी कपड्याच्या निर्यातीमध्ये त्याचे वैशिष्ट्य असण्याचे कारण म्हणजे व्यापारीशास्त्र हे होय इ. स १९७० मध्ये मॉरिशस सरकारने निर्यातवस्तू निर्मिती उद्योगाच्या विकासाची योजना आखलेली असून भरपूर कर सवलती दिल्या जातात. हिऱ्याना पैलू पाडणे, प्लॅस्टिकवस्तू तयार करणे, शोभिवत खडे, खेळणी, आगपेट्या आणि विणमाल ही इथली बिगरशेती उत्पादने आहेत ऊस आणि त्याखालोखाल चहा ही प्रमुख उत्पादने मॉरिशसमध्ये ऊसमळ्यानी इतकी जागा व्यापली आहे की इतर भाजीपाले लावण्यापेक्षा शेजारच्या भागातून आयात करणे सोयीस्कर ठरते खनिज सपत्ती अल्प आहे. मॉरिशसच्या औद्योगिक जगताला अलीकडे भेडसावणारा प्रश्न म्हणजे कामगाराची सतत वाढत जाणारी गैरहजेरी हा होय. व्यवस्थापनशास्त्रज्ञाना मॉरिशसमध्ये काही काळ या क्षेत्रामध्ये काम करण्यास भरपूर वाव आहे. परकीय गुतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी मॉरिशस सरकारच्या अनेक सोयी आणि सवलती आहेत. फ्रेच, दक्षिण आफ्रिकन, पश्चिम जर्मन आणि भारतीय प्रामुख्याने मॉरिशसमध्ये गुतवणूक करतात. मॉरिशसला येण्यासाठी बऱ्याच देशाना परवाना लागत नसल्यामुळे आणि मॉरिशसला दक्षिण आफ्रिकेची बाजारपेठ खुली असल्यामुळे भारतीय उद्योगाला मॉरिशसची मैत्री हे एक वरदान आहे. भारतीय बनावटीचा कपडा आणि ड्रेस मटेरियल भारतापेक्षा (एक्स्पोर्ट इन्सेटिव्ह स्कीममुळे) मॉरिशसमध्ये वाजवी आणि स्वस्त भावात मिळतो मॉरिशसमध्ये इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे स्वस्त असतात, परतु भारतातील सभाव्य ड्यूटीमुळे ती कोणत्या भावात जातील ते सागणे कठीण असते पाकशास्त्रप्रेमीना मसाल्याचे पदार्थ– लवगा, दालचिनी, चारोळ्या, बदाम, केशर इत्यादी स्वस्त भावात उपलब्ध असते

## मॉरिशस प्रवास (अधिक माहिती)

मॉरिशसला जाताना आणि तेथून परत येताना दोन्ही वेळेला एअरपोर्ट टॅक्स भरावा लागतो मुबईच्या विमानतळावर ही रक्कम प्रवास प्रत्यक्ष सुरू करण्याआधी रुपये तीनशे रोख या स्वरूपात द्यावी लागते मॉरिशसमधून परत निघताना तिथल्या विमानतळावर मॉरिशिअन शभर रुपये भरावे लागतात दोन वर्षांखालील मुलाना आणि मॉरिशिअन साठ वर्षांवरील व्यक्तींना या करामध्ये माफी मिळते प्रवासाला निघण्यापूर्वी आपल्या पासपोर्टची एक झेरॉक्स प्रत नेहमी आपल्याजवळ त्वरित सदर्भासाठी ठेवावी कारण किमान ३/४ वेळा तरी दिल्या जाणाऱ्या फॉर्ममध्ये भरण्यासाठी त्याचा उपयोग होतो

महत्त्वाचे मॉरिशसमध्ये पोहोचल्यावर जर सर्वात मोठी पाटी आपले लक्ष वेधून घेत असेल तर ती म्हणजे 'इम्पोर्टेशन् ऑफ ड्रग्ज् इज् लायेबल् ट् डेथ पेनल्टी' ही होय. आपल्या मॉरिशसच्या सपूर्ण प्रवासामध्ये (तुम्ही कुठेही जात असाल तिथे) तुमच्या पासपोर्टची प्राणपणाने काळजी घ्या. अलीकडे ड्रग्जच्या बेकायदेशीर व्यवहारात गुतलेल्या काही टोळ्या पासपोर्टच्या चोऱ्या करतात असे ऐकिवात असल्यामुळे ही सूचना द्यावीशी वाटते मॉरिशसमधील नागरिक अत्यत आतिथ्यशील असून मॉरिशस सरकारही टुरिझम या व्यवसायाकडे एक प्रमुख व्यवसाय म्हणून पाहते इ. स. १९८९ मध्ये एकूण २६५३०० प्रवाशानी मॉरिशसला भेट दिली होती त्यातील प्रमुख प्रवासी हे फ्रान्स आणि दक्षिण आफ्रिकेतील होते. भारतातील प्रवाशाची सख्या--

| १९८८ | १९८९ | १९९० | |
|---|---|---|---|
| ४२२० | ५०७० | ६००० | (सुमारे) |

१९९० मध्ये मोका-मॉरिशस येथे भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनामुळे प्रवाशाची ही सख्या वाढलेली असून १९९१ मधील मॉरिशसमध्ये होणाऱ्या जागतिक मराठी परिषदेच्या अधिवेशनासाठी जगभरचे शेकडो मराठी भाषिक येतील तसेच अन्य ट्रेडफेअर्समुळे या सख्येत वाढ होईल असे अनुमान करता येते

मॉरिशसमध्ये सर्वात जास्त खर्च टॅक्सीवर होतो असा अनुभव आहे. विमानतळापासून प्रमुख शहरात यायला साधारण तीनशे मॉरिशिअन रुपये लागतातच, परतु शहरात कुठल्या एक-दोन किलोमीटर्सच्या अतरावरील प्रवास

करायचा म्हटले तर पचवीस ते तीस रुपये द्यावे लागतात त्यामानाने येथील बसचा प्रवास खूपच सोयीचा आणि स्वस्त आहे. इथले बस कडक्टर्स अत्यंत शालीन स्वभावाचे असून पुण्यातील कडक्टर्सप्रमाणे 'शाळेत हेच शिकवतात का?' सारखी विचारपूस करीत नाहीत. त्याच्या कार्यक्षमतेप्रमाणेच त्याच्या सचोटीवर बस अधिकाऱ्याचा इतका विश्वास असतो की मॉरिशसमध्ये 'तिकिटचेकर' ही सस्था नाही सध्याकाळी ६च्या पुढे बस प्रवासात असल्यास ज्या स्टॉपवर उतरायचे असेल त्या स्टॉपवर बस येण्याआधी बेल वाजवणे आवश्यक असते नाहीतर एखाद्या प्रमुख स्टॉपवरही कुणी 'चढाऊ' नसल्यास उतारूला उतरता येणार नाही आणि तुम्ही खूप पुढे गेलेले असाल. मॉरिशसच्या प्रमुख शहरातून काही एक्सप्रेस बसेस सोडण्यात येतात. त्यामुळे तुमचा खूप वेळ वाचतो

एअरपोर्टवरून गावात येण्यासाठी रूट क्र. २ आणि १६२ ह्या आहेत. त्या क्यूपिपला रूट क्र. ९ साठी बदलाव्या लागतात. मॉरिशसला जाताना आपल्याबरोबर सामान खूप असल्यामुळे ह्या बसेसचा फायदा घेता येत नाही, परतु पधरा-वीस जणाच्या ग्रूपने प्रवासाला निघाल्यास एका टॅक्सीत सामान टाकून एखाद्या दुसऱ्या प्रवाशाने इच्छित स्थळी जायचे आणि इतरानी बसने प्रवास करायचा असे करता येईल. महात्मा गाधी इन्स्टिट्यूटचा मॉरिशसमधील 'मोक्याचा' स्टॉप 'एम् जी आय्' या आद्याक्षराने ओळखला जातो. तिथून जवळच मॉरिशस विद्यापीठाचा (रेदुइट) स्टॉप आहे. कात्र बोर्नहून मोक्याला येणाऱ्या प्रवाशाना रूट क्र. १५३ ही सेंट पिएरेची बस सोयीस्कर असते रोझहिलवरून रूट क्र. १५A ने तसेच सेबॅस्टेपोलहून रूट क्र. १६ आणि १६ए ने मोक्याला येता येते

## काही महत्त्वाचे मॉरिशसचे बस क्र. आणि त्याचे मार्ग

### *पोर्टलुईवरून सुटणाऱ्या बसेस*

| शेवटचा स्टॉप | रूट क्रमाक | मार्गाचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|
| विमानतळ | २,१६२ | | क्र ५ साठी क्युपिपहून |
| अल्बियन | १,२,३ | कोरोमॅण्डेल, बोबासा, रोझहिल | क्र ४५ साठी रोझहिलला बदल |
| बे द कॅप | ३A, ३B, ३C, ३D | कोरोमॅण्डेल, बोदास्ल, रोझहिल, कात्रबोर्न | |

| | | | |
|---|---|---|---|
| बॅलफोर | १B | रोझहिल | |
| ब्युक्स लॉंग्ज | ६A | बोलन्सा-रोझहिल-कात्रबोर्न | |
| बेले रिव्हे | २,२A | रोझहिल-क्युपिप | क्युपिचाल क्र ३० साठी बदल |
| बोर्डस कॅस्केड | ३B | रोझहिल-कात्रबोर्न-ल कॅव्हार्ने | |
| कॅंजोस | ३,३A, ३B, ३C, ३D, १०३ | रोझहिल-कात्रबोर्न | |
| चॅमॅरेल | ३A, ३B, ३C, ३D | रोझहिल-कात्रबोर्न | |
| फॉरेस्ट साईड | २,२A, १४९,१६२ | बोवसा-रोझहिल-कात्रबोर्न | |
| मोर्ने ब्रॅलॅट | ३A, ३B, ३C, ३D, | बोबासा रोजहिल, कात्रबोर्न | |
| रेदुइट युनिव्हर्सिटी | १४१ | न्यू ट्रकरोड | |
| रोझहिल | १,१A, २,३ | कोरीमॅंडेल-बोबासा | |
| सेंटपॅट्रिक | | कोरोमॅंडेल-बोबासा-रोझहिल | |
| बाकीआ | ३,३A | बोबासा-रोझहिल-कात्रबोर्न | |

## *रोझहिल वरून सुटणाऱ्या बसेस*

| | | |
|---|---|---|
| अर्गी | १५,१६ | रेदुइट-सेंट जिएरे-कॉर्टिएर, मिलिटेर-प्रॉव्हिडस |
| बोर एअर | १६ | रेदुइट-सेंट जिएरे-कॉर्टिएर मिलिटेर-प्रॉव्हिडस |
| बेलेमेअर | १५,१६ | रेदुईट-सेंट पिऐर-कॉर्टिएर मिलिटेर-सेंट्रल फ्लाक |
| बेले रिव्हे, फ्लाक | १६,१६A | रेदुईट-सेंटपिएरे-कॉर्टिएर मिलिटेर-ब्लॅंके |
| क्युपिप | २ | फिनिक्स-कॅसेल |
| मोका | १३ | रेदुईट |
| प्रॉव्हिडन्स | १५,१६D | मोका-सेंट पिएरे-कॉर्टिएर |

| | | |
|---|---|---|
| | | मिलिटेर |
| सेंट पिएर | १५A | रेदुइट-मोका |
| व्हॅलेटा | १३ | रेदुइट-मोका-सेंट जिएरे, व्हर्दुन, दॅगोतिएरे |
| व्हर्दुन | १३,१५, १५A, १५D | रेदुइट-मोका-सेंट पिएरे |

### *कात्रबोर्नवरून सुटणाऱ्या बसेस*

| | | |
|---|---|---|
| क्युपिप | ४,४A, १७D | कॅडॉस-ल कॅव्हर्ने-वाकीआ |
| सेंटपिएरे | १५३ | रेदुइट-मोका (MGI) |

### *क्युपिपवरून सुटणाऱ्या बसेस*

| | | |
|---|---|---|
| माहेबर्ग | ९,९A | नोव्हेल फ्रान्स-रोझ लेले-प्लेन मॅग्नीएन |
| सेंट पिएरे | १७३ | कॅसल-फिनिक्स-सेंट जेन न्यू ट्रक रोड, रेदुइट-जटिली |

(वरील बसमार्गाचे पत्रक हे केवळ निवडक मार्गावरील आहे. आवश्यक असल्यास मॉरिशसच्या नॅशनल ट्रान्स्पोर्ट ऑथॉरिटीच्या बसगाईडमध्ये बस क्रमाकाचा आणि स्थळाचा विस्तृत तपशील उपलब्ध असतो.) रविवारी आणि सुट्ट्याच्या दिवशी मॉरिशसच्या नॅशनल ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन तर्फे प्रेक्षणीय स्थळाच्या सहलीसाठी बसेस उपलब्ध असतात. (NTC टेलिफोन ८६२९३८ वर अधिक माहिती मिळू शकते.)

## भाड्याने मिळणारी वाहने

मॉरिशसमधील स्थळाना भेटी देण्यास सुलभ असे १७९० कि. मी चे डाबरी रस्ते बाधण्यात आले आहेत. या प्रत्येक रस्त्यावर वाहन चालवण्याच्या गतीच्या मर्यादा ठळकपणे दर्शविल्या जातात. स्वतःचे ड्रायव्हिंग लायसन्स असणाऱ्याना पोर्टलुईच्या ट्रॅफिक ब्रॅचशी सपर्क साधून (टेलि. ८१२१२) आपले लायसेन्स नोंदवून घ्यावे लागते भाड्याच्या टॅक्सीजमध्ये जगभर प्रसिद्ध असलेली हर्ज कपनी

(टेलिफोन क्र. ८६१४५३) ही क्युपिपवरून व्यवहार पाहते. कात्रबोर्नच्या डोडो टुअरिंग (५४६८१०), आणि मास्क टुअरिंग (५४६९७५) बोबासाच्या कम्फर्ट कार (५४२८०८), रोझ हिलच्या ऑटो इटरनॅशनल (५४३५८५) या प्रसिद्ध आहेत. गाड्या ड्रायव्हरसह अगर ड्रायव्हरशिवाय भाड्याने पुरवल्या जातात. दर दिवशीच्या मिनीकारसाठी ड्रायव्हरसह रु. ७५० तर ड्रायव्हरविरहित रु. ६०० एवढा दर असतो

काही हॉटेल्समधून फेरफटका मारण्यासाठी सायकली भाड्याने मिळतात. ग्रँड बे आणि पेरिबेरे या सागरतीराजवळ मोटर सायकली भाड्याने मिळतात. एअर मॉरिशसची हेलिकॉप्टर सेवा असून तिचा टेलिफोन क्र. ८७७०० असा आहे. रिव्हिएरे-द-रॅम्पार्ट येथे बलून राईड्सचीही सोय असते (फोन क्र. २७९५०).

□

# मॉरिशस ९१

काल दिसला वनात
शकुनी तो भारद्वाज
सांगे माहेराचे कुणी
येई घरी तुझ्या आज. . .
पैलावरूनी तो येई
जसा ज्ञानेशाचा काऊ
कौल जाणुनिया लागे
मन आनंदाने गाऊ
सत्यवचनी तयाचा
खोटा नव्हता अंदाज
सांगे माहेराचे कुणी
येई घरी तुझ्या आज. . .
त्याच्या पाऊलात नाद
शतकांचे ओळखीचे
राम, कृष्ण, शिवबांचे
थोर सन्त-पालखीचे
"हरहर महादेव"
घुमे त्यातही आवाज

सागे माहेराचे कुणी
येई घरी तुझ्या आज. . .
त्याच्या आवाजात आहे
एक आपुलीशी हाक
त्याच्या आगमनी आहे
चैतन्याची आणभाक
रम्य भेटीचा सोहळा
लाजवितो सोळा साज
सांगे माहेराचे कुणी
येई घरी तुझ्या आज. .
एक अतूट प्रेमाचे
जगावेगळ्या जगाचे
आज जोडिले तयाने
पुन्हा संबंध युगाचे
भेटू शतकोशतकी
जुना पाळुया रिवाज
सागे माहेराचे कुणी
येई घरी तुझ्या आज. . .

– गगाधर महाम्बरे

# आमच्याकडे मिळणारी प्रवासवर्णनावरील पुस्तके

**वासंती घैसास**

चला सफरीला

सफर ईशान्य भारताची

संपूर्ण मध्य प्रदेश

**प्र. के. घाणेकर**

साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्यांची

जलदुर्गाच्या सहवासात

आडवाटेवरचा महाराष्ट्र

**रमेश मंत्री**

सूर्यपुत्राचा देश जपान

**अरुण खोरे**

दोन युरोप

**द. दि. कुलकर्णी**

भूनंदनवन काश्मीर

**प्रा. ना. ल. वैद्य**

थेम्स ते नाईल

**सुरेशचंद्र वारघडे**

बदरीकेदारची निसर्गयात्रा


REFBK-0026388


हसरे हॉगकॉग

अखील भारतीय पर्यटनसाथी

भ्रमण सगी

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ३०